सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## नाशिकमध्ये मतदार यादीत मोठी उलथापालथ ! 10 लाख 27 हजार मतदारांची नावे वगळली

**नाशिक :** मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण अर्थात एसआरआर मोहिमेत नाशिक जिल्ह्यात तब्बल १० लाख २७ हजार ८९४ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. मात्र, आतापर्यंत या वगळलेल्या नावांच्या अनुषंगाने कोणतीही हरकत किंवा तक्रार दाखल झालेली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र मतदारांनी आपले नाव यादीत आहे की नाही, याची खात्री करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली मतदार यादी पुनरीक्षणाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला आमदार सीमा हिरे, नितीन पवार, हिरामण खोसकर, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद तसेच सर्व विधानसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध कारणांमुळे १० लाख २७ हजारांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. यामध्ये नाशिक शहरातील चार मतदारसंघांचा वाटा मोठा आहे. नाशिक मध्य, नाशिक पश्चिम, नाशिक पूर्व आणि देवळाली या चार विधानसभा मतदारसंघांमधून एकत्रितपणे सुमारे ५.५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, प्रारूप यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांच्या संदर्भात आतापर्यंत कोणत्याही हरकती किंवा तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याची माहिती बैठकीत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना देण्यात आली. मतदार यादी पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये, यासाठी राजकीय पक्षांनी बूथ स्तरावरील एजंट अर्थात बीएलए नियुक्त करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दरम्यान, काही राजकीय प्रतिनिधींनी बीएलओ अर्थात बूथ स्तरावरील अधिकाऱ्यांकडून घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याच्या तक्रारी बैठकीत मांडल्या.

## कच्च्या तेलाच्या दरवाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम

# महागाई वाढण्याची आणि रुपया कमजोर होण्याची शक्यता

**नवी दिल्ली:** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ झाली असून, ब्रेंट क्रूड प्रति बॅरल ११० डॉलरच्या तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड १०५ डॉलर प्रति बॅरलच्या जवळ पोहोचले आहे. भारताच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जात असल्यामुळे, या दरवाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महागाई वाढण्यासह रुपयावर मोठा दबाव आला आहे.

**रुपयात विक्रमी घसरण आणि परकीय चलन साठ्यावरील ताण**

टीएनव्ही फायनान्शियल सर्व्हिसेसचे सीईओ तारकेश्वर नाथ वैष्णव यांच्या मते, कच्चे तेल महाग झाल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना डॉलरची मागणी वाढवावी लागली आहे. यामुळे डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया विक्रमी घसरणीसह ९५.८० रुपयांच्या पातळीवर पोहोचला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) बाजारात डॉलर पुरवठा करून रुपयाला सावरण्याचा प्रयत्न करत असली, तरी क्रूडच्या किमती याच पातळीवर राहिल्यास देशाच्या परकीय चलन साठ्यावर मोठा ताण येऊ शकतो.

**शेअर बाजारावर आणि ऑईल मार्केटिंग कंपन्यांवर परिणाम**

वाढलेल्या खर्चामुळे बीएसईचा सेन्सेक्स इंट्रा-डेमध्ये ७४० अंकांहून अधिक घसरला होता. खुराना सिक्युरिटीज अँड फायनान्शियल सर्व्हिसेसचे सीईओ रविचंदर खुराना यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दरवाढीचा सर्वाधिक फटका ऑईल मार्केटिंग कंपन्यांना बसणार असून पेट्रोल, डिझेल, सीएनजी, पीएनजी आणि एलपीजीच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. तसेच, एअर टर्बाइन फ्युएल (ATF) महाग झाल्यामुळे आधीच दबावात असलेल्या एव्हिएशन क्षेत्रावर आणखी परिणाम होईल.

**उद्योग क्षेत्रांवर दुहेरी मार आणि महागाईची शक्यता**

कच्च्या तेलावर अवलंबून असलेल्या पेंट आणि प्लास्टिक उद्योगांच्या प्रॉफिट मार्जिनमध्ये मोठी घट होऊ शकते, ज्यामुळे कंपन्यांना उत्पादनांच्या किमती वाढवाव्या लागतील. याउलट, ओएनजीसी आणि ऑईल इंडिया लिमिटेडसारख्या देशांतर्गत कच्च्या तेलाचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी पाहायला मिळू शकते. तसेच, पारंपरिक इंधनांचे दर वाढल्यामुळे टाटा पॉवर आणि अदाणी ग्रीनसारख्या रिन्यूएबल एनर्जी क्षेत्राकडे गुंतवणूकदारांचा ओघ वाढू शकतो.

**चालू खात्यातील तूट आणि सर्वसामान्यांच्या खिशावर भार**

आंतरराष्ट्रीय बाजारातील ही दरवाढ दीर्घकाळ कायम राहिल्यास भारताची चालू खात्यातील तूट (CAD) आणि वित्तीय तूट वाढू शकते, तसेच परकीय भांडवलाचा ओघ बाहेर जाऊ शकतो. मालवाहतूक खर्च वाढल्यामुळे भाज्या, फळे, औषधे आणि दैनंदिन वापरातील वस्तू महाग होऊन सर्वसामान्यांच्या बजेटवर मोठा परिणाम होईल आणि भारताच्या जीडीपी विकासदराचा वेगही मंदावू शकतो.

## सिंहस्थ कुंभमेळ्यात अमृत पर्वणीला खासगी वाहनांना 'नो एंट्री'!

### 1500 हेक्टरवर वाहनतळांचे नियोजन

**नाशिक :** पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृत पर्वणीच्या दिवशी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहरात भाविकांच्या खासगी वाहनांना थेट प्रवेश दिला जाणार नाही. देशभरातून येणाऱ्या भाविकांची वाहने शहराबाहेर उभारण्यात येणाऱ्या नियोजित वाहनतळांवर थांबवली जाणार आहेत. त्यानंतर भाविकांना विशेष बससेवेद्वारे अमृत स्नानाच्या ठिकाणी नेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने मोठ्या प्रमाणावर तात्पुरते वाहनतळ उभारण्याची तयारी सुरू केली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये मिळून तब्बल १,५५९ हेक्टर क्षेत्रावर ७२ वाहनतळ प्रस्तावित करण्यात आले आहेत.

**नाशिकमध्ये ४६, तर त्र्यंबकेश्वरमध्ये २६ वाहनतळ प्रस्तावित नियोजनानुसार**

नाशिकमध्ये सुमारे ८८८ हेक्टर क्षेत्रावर ४६ वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव आहे. तर त्र्यंबकेश्वरमध्ये सुमारे ६७१ हेक्टर क्षेत्रावर २६ वाहनतळ प्रस्तावित आहेत. या सर्व वाहनतळांची एकत्रित क्षमता सुमारे तीन लाख मोटारी इतकी ठेवण्याचे नियोजन आहे. कुंभमेळ्याच्या काळात मोठ्या संख्येने भाविक खासगी वाहनांनी दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही व्यवस्था करण्यात येत आहे. तात्पुरते वाहनतळ उभारण्यासाठी खासगी जागा उपलब्ध करून देण्यास इच्छुक जमीनमालक आणि पात्र संस्थांकडून अर्ज मागविण्यात येणार आहेत. अर्ज प्रक्रिया, पात्रता आणि आवश्यक अटींबाबतची माहिती संबंधित यंत्रणेकडून उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही माहिती विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिद्ध केली जाणार आहे.

## अन्नातून विषबाधा; बहीण-भावाचा मृत्यू, थोटे कुटुंबावर दु:खाचा डोंगर



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.११ सप्टेंबर - अन्नातून विषबाधा झाल्याने एकाच कुटुंबातील चार जणांना उलट्या-जुलाबाचा त्रास झाल्यानंतर उपचार सुरू असताना बहीण-भावाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना चिंचोली लिंबाजी येथे घडली. आयुष नारायण थोटे याचा गुरुवारी पहाटे मृत्यू झाल्यानंतर शुक्रवारी त्याची सहा वर्षीय बहीण गायत्री नारायण थोटे हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून थोटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

चिंचोली लिंबाजी येथील थोटे कुटुंबातील चार जणांना मंगळवारी रात्री घरातील खिचडी खाल्ल्यानंतर विषबाधेसदृश त्रास झाला. त्यांना उलट्या-जुलाब सुरू झाल्यानंतर स्थानिक पातळीवर उपचार करण्यात आले. मात्र, प्रकृती बिघडल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले.

या घटनेत आयुष नारायण थोटे याचा गुरुवारी (दि. १०) पहाटे ५.१५ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर त्याची सहा वर्षीय बहीण गायत्री नारायण थोटे हिच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी दवाखान्यात उपचार सुरू होते. मात्र, शुक्रवारी (दि. ११) सकाळी ८.१५ वाजता उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

गायत्रीच्या मृत्यूची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी हे पथकासह चिंचोली लिंबाजी येथे दाखल झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त मेमोच्या आधारे पिशोर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मृतदेह शवविच्छेदनासाठी घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी फारूक सिद्दीकी यांनीही घटनास्थळी भेट दिली. त्यांनी घरातील अन्नाचे विविध नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. तसेच फॉरेन्सिक पथकालाही गावात पाचारण करण्यात आले असून घटनास्थळावरील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांची तपासणी करण्यात येत आहे.

प्राथमिक माहितीनुसार अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे हा प्रकार घडल्याचे समोर येत असले, तरी मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे अन्नातून विषबाधा नेमकी कशामुळे झाली, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकरणाची चौकशी पोलीस नाईक एफ.एन. बर्डे यांच्याकडे सोपविण्यात आली असून, नातेवाईकांची चौकशी आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

एकाच कुटुंबातील दोन चिमुकल्यांचा अवघ्या काही तासांच्या अंतराने झालेला मृत्यू मन हेलावून टाकणारा ठरला असून, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## 'लाइव्ह इव्हेंट'साठी राज्य सरकारकडून 'एसओपी'

### 15 दिवस आधी अर्ज बंधनकारक; पूर्वमंजूर ठिकाणांना पुनर्तपासणीतून सवलत

**मुंबई :** संगीत कार्यक्रम, सांस्कृतिक महोत्सव, क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शनांसह विविध 'लाइव्ह इव्हेंट'च्या परवानग्यांसाठी राज्य सरकारने प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) मंजूर केली आहे. त्यामुळे विविध विभागांच्या परवानग्यांसाठी स्वतंत्र कार्यालयांत जाण्याऐवजी एकाच डिजिटल प्रणालीतून अर्ज, छाननी, मंजुरी आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया होणार आहे. कार्यक्रमांच्या परवानग्या कालबद्ध पद्धतीने मिळाव्यात आणि आयोजनातील प्रक्रियात्मक अडथळे कमी व्हावेत, हा यामागील उद्देश आहे.

माहिती व जनसंपर्क विभागाच्या समन्वयाने ही व्यवस्था राबविली जाणार असून, पोलीस, वाहतूक पोलीस, महापालिका किंवा ग्रामपंचायत, अग्निशमन दल, विद्युत सुरक्षा, राज्य उत्पादन शुल्क, परदेशी कलाकारांसाठी एफआरआरओ, वारसास्थळांवरील कार्यक्रमांसाठी पुरातत्त्व विभाग आणि संगीत परवान्यांसह आवश्यक मंजुरींचा त्यात समावेश असेल. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार महाराष्ट्र सागरी मंडळासह अन्य संबंधित प्राधिकरणांच्या परवानग्याही या प्रणालीतून घेता येतील.

कार्यक्रमाच्या नियोजित तारखेच्या किमान १५ दिवस आधी 'कॉमन ॲप्लिकेशन फॉर्म'द्वारे अर्ज करावा लागेल. सर्व माहिती उपलब्ध असल्यास विविध परवानग्यांसाठी एकाच वेळी अर्ज करता येईल. १५ दिवसांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असल्यास 'तात्काळ प्रक्रिया'चा पर्याय असेल; मात्र त्यासाठी अतिरिक्त प्रक्रिया शुल्क द्यावे लागेल. सामान्य प्रक्रियेत अर्ज प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांत निर्णय घेणे अपेक्षित आहे. अर्जात त्रुटी किंवा काही प्रश्न असल्यास ते पहिल्या तीन दिवसांत कळवावे लागतील. त्यानंतर नव्याने प्रश्न उपस्थित करण्यावर मर्यादा असेल. सुरक्षा किंवा कायदेशीर पालनाशी संबंधित कारण असल्यास त्याची लेखी नोंद करावी लागेल.

## ट्रक -दुचाकीचा अपघात :तीन मित्रांचा मृत्यू!




बीड – बीड नजीक असलेल्या उखंडा तलावाजवळ ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन तरुण मित्रांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. हे तिघे तरुण नवगण राजुरी येथील रहिवाशी असून या घटनेमुळे परिसरावर शोककळा पसरली आहे.

कैलास टुले, ऋषिकेश फुलझळके आणि अक्षय शिंदे अशी मृतांची नावे आहेत. अहिल्यानगर बीड महामार्गाचे काम सध्या सुरु आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे तसेच अर्धवट पूल आहेत.

उकंडा तळ्याजवळ पुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तिघांचाही जागीच मृत्यू झाला.दरम्यान, पुलाच्या कामाच्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक दिशादर्शक फलक, रेडियम पट्टे अथवा इतर सुरक्षाव्यवस्था नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. बीड-नवगण राजुरी मार्गाचे राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. बांधकामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने हा अपघात घडल्याचा आरोप होत आहे.




**नांदेड –मराठवाड्यातील रखडलेल्या विकासकामाबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडुन 'तुमसे ना हो पायेगा' आदोलन करण्यात येत आहे. या अनुषंगाने शिवसेना नेते खा. संजय राऊत, विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांच्या उपस्थितीत नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जन आंदोलन करण्यात आले. (छाया– ज्ञानेश्वर सुनेगावकर, नांदेड)**

## शेत रस्त्याच्या वादावरून नायगाव खंडेवाडी येथे सावे पिता-पुत्रास मारहाण, अमेय सावेंच्या डोक्याला मार

बिडकीन दि ११ सप्टेबर - शेतीच्या बांधावरूनची भांडण असो किंवा जमिनीवरुन वाद असो, अनेकदा अशा वादाला गंभीर स्वरुप मिळते. अनकेदा भावा-भावात, भाऊबंदकीत आणि शेतीच्या शेजाऱ्यासोबतही असे वाद होतात. मात्र, या आता चक्क राज्यातील मंत्री अतुल सावे यांचे मोठे बंधु आणि पुतण्या यांनाच शेत रस्त्याच्या वादावरुन मारहाण झाल्याच समजते. अमेय अजित सावे (वय ३५ वर्षे) आणि अजित मोरेश्वर सावे (७० वर्षे) रा. खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर अशी मारहाणीत जखमी झालेल्यांची नावे आहेत.शेती व रस्त्याच्या वादातून एका गटाने अतुल सावे यांच्या बंधूंना मारहाण केल्याची घटना घडल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पैठण तालुक्यातील बिडकीन पोलिस ठाणे हद्दीतील नायगाव खंडेवाडी येथे दि १० बुधवारी ही घटना घडल्याची माहिती आहे. मारहाण झाली दोघांनाही ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते आमच्या डोक्याला मार लागला असून दोन ठिकाणी डोक्याला जखम झाली असून सहा टाके पडले असल्याचे डॉक्टर पाटील यांनी सांगितले. पुढील उपचारासाठी त्यांना संभाजीनगर येथे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची समजते दरम्यान, या घटनेनंतर स्थानिक बिडकीन पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली असून रुग्णालयात जखमींची विचारपूस आणि जबाब नोंदवण्यासाठी पोलीस संभाजीनगर येथे रवाना झाले आहे अशी प्राथमिक माहिती आहे. दरम्यान याप्रकरणी जखमींच्या जवाबदानंतर बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# हिंगोलीतील 15 हजार 693 शेतकरी कर्जमुक्तीस पात्र

## आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ११ सप्टेंबर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील १५ हजार ६९३ पात्र शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणासाठी दुसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी तपासून जवळच्या आपले सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेले आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेले पीक कर्ज व पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. राज्यातील पात्र लाभार्थ्यांची दुसरी यादी ११ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यात तीन लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्हानिहाय यादीत हिंगोली जिल्ह्यातील १५ हजार ६९३ शेतकरी पात्र ठरले आहेत. ही यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीची आहे. त्यानंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्यावरील थकबाकीची खातरजमा करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांच्या काही कर्ज खात्यांमध्ये ३१ मार्च २०२६ रोजीची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या 'हेअर कट' धोरणानुसार ही कर्जे निरंक करण्यात येणार आहेत. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर जमा करण्यात येणार आहे.

योजनेतील पात्र लाभार्थ्यांमध्ये मयत तसेच वयस्कर आणि बोटांचे ठसे नोंदविण्यात अडचण येणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली (डजझ) जारी करण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने फार्मर आयडी काढून घेणे आवश्यक आहे. फार्मर आयडी नसल्यास संबंधित पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच, यादीतील पात्र शेतकरी मयत असल्यास त्यांच्या वारसांनी ७/१२ उताऱ्यावर वारसांची नोंद करून घेऊन फार्मर आयडी काढणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया देखील तातडीने पूर्ण करावी.

कर्जमुक्तीबाबत काही तक्रार अथवा शंका असल्यास पात्र शेतकऱ्यांना संकेतस्थळावर ऑनलाइन तक्रार दाखल करता येईल, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सुरेखा फुफाटे यांनी दिली आहे.

## राज्यावर दुष्काळाचे सावट ! - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे; पुढील 3-4 दिवसांत अहवालानंतर कार्यवाही करणार

**पुणे :** राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने पिके संकटात सापडली असून, दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी पेरलेली पिके जळण्याच्या अवस्थेत आहेत. राज्यातील परिस्थितीचा अहवाल पुढील तीन-चार दिवसांत प्राप्त झाल्यानंतर सरकार योग्य तो निर्णय घेईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवारी दिली. तसेच कमी पाऊस झालेल्या भागांचा आपण पुढील आठवड्यापासून दौरा करणार असल्याचेही भरणे यांनी सांगितले

पुण्यात माध्यमांशी बोलताना भरणे म्हणाले की, जूनमध्ये पाऊस झाला नाही, जुलैमध्ये काही प्रमाणात पाऊस झाला; मात्र ऑगस्टमध्ये पावसाने मोठा खंड दिला. पुणे, कोकण आणि ठाणे परिसराचा काही भाग वगळता मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राचा पूर्व भाग आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. त्यामुळे शेतकरी अडचणीत असून कापूस आणि सोयाबीनचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाअभावी बैलपोळ्याच्या सणावरही परिणाम झाला असून शेतकरी नाराज असला तरी वर्षभर शेतकामात साथ देणाऱ्या बैलाची पूजा करण्याचे कर्तव्य म्हणून हा सण साधेपणाने साजरा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये आणि मजुरांना २५ हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी रोहित पवार यांच्यासह काही आमदारांनी केली आहे. ही मागणी चुकीची नाही, असे सांगत भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील परिस्थितीचे अहवाल मागविण्याचे निर्देश दिल्याचे नमूद केले. तीन-चार दिवसांत अहवाल आल्यानंतर सरकार योग्य तो निर्णय घेईल, असे ते म्हणाले. कमी पावसाच्या परिस्थितीत कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्याबाबतही सरकार सकारात्मक विचार करेल, असे भरणे यांनी सांगितले. यापूर्वीच्या कृत्रिम पावसाच्या प्रयोगांचे अनुभव फारसे चांगले नव्हते. मात्र, नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले असल्यास त्याचा विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



**केज/प्रतिनिधी :** सध्या केज तालुक्यात पावसा अभावी दुष्काळ जन्य परिस्थिति असताना देखील आपल्या लाडक्या सर्जा राजाची बैल पोळ्याच्या सणानिमित्त मनोभावे मिरवणूक काढताना तालुक्यातील चिंचोली माळी येथील शेतकरी राजा. (छाया:- अनिल गलांडे)


## धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते प्रो डॉ नवनाथ काशीद यांचा सत्कार




**केज दि १०(प्रतिनिधी) :** हरित धाराशिव 2.0 या धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबवण्यात आलेल्या वृक्ष लागवडीच्या उपक्रमामध्ये 14 ऑगस्ट 2026 रोजी धाराशिव जिल्ह्याच्या विविध तालुक्यात एका दिवसामध्ये एकूण (10) दहा लाख झाडांची लागवड करण्यात आली. याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. या उपक्रमामध्ये जिल्हा प्रशासन व ग्रीनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या कमिटीने तज्ञ परीक्षक म्हणून वनस्पती शास्त्रज्ञांची नियुक्ती केली होती. त्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली 10 लाख वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याच्या नोंदी झाल्या व त्या नोंदणी नुसार ग्रीनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये त्याची नोंद झाली. या सन्मानात वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र माननीय जिल्हाधिकारी यांच्या हस्ते तज्ञपरीक्षक वनस्पती शास्त्रज्ञ ,बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्रो डॉ नवनाथ काशीद यांना प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथे सन्मानित करण्यात आले.

या विशेष कार्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## तुलसी महाविद्यालयात विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विज संदर्भात मार्गदर्शन सत्र संपन्न




**बीड:** (प्रतिनिधी) : युवकांच्या सहभागातूनच विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या माय भारत पोर्टलवरील उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे प्रतिपादन बीडचे जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत माय भारत पोर्टलवर आयोजित विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विज संदर्भात विशेष विद्यार्थी संवाद व मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या मार्गदर्शन सत्रात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे हे होते. या प्रसंगी माय भारत युथ आयकॉन सिद्धार्थ वाघमारे आणि सनी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सागर उज्जैनकर यांनी माय भारत पोर्टलचे स्वरूप, त्यावरील विविध उपक्रम तसेच विकसित भारत क्विजच्या विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली. देशाच्या विकासात तरुणांचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. विशेष अतिथी सिद्धार्थ वाघमारे यांनी माय भारत पोर्टलच्या माध्यमातून तरुणांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध संधी आणि राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डी.जी.निकाळजे यांनी सर्व विद्यार्थ्यांना विकसित भारत क्विज मध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बापूराव दादा साळुंके यांच्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. बबन देव जोशी महाराज यांचे हरिकीर्तन

**बीड प्रतिनिधी :** वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे ह.भ.प. बापूराव दादा साळुंके यांच्या २३व्या पुण्यतिथी उत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात दिनांक 14 सप्टेंबर २०२६ भाद्रपद श्री गणेश चतुर्थी ला साजरा करण्यात येणार आहे.

या सोहळ्यानिमित्त रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ ते १२ वाजेपर्यंत कवडगाव-मोरेवाडी भजनी मंडळाच्या वतीने हरिजागर व भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तसेच सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत बीड जिल्ह्यातील नामवंत कीर्तनकार, भागवत कथा प्रवक्ते व ज्योतिषाचार्य ह.भ.प. बबन देव जोशी महाराज यांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यांच्या रसाळ वाणीतून होणाऱ्या हरिकीर्तनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.

बापूराव दादा साळुंके यांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या या पुण्यतिथी सोहळ्यास परिसरातील भाविक, वारकरी व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त साळुंके परिवार, कवडगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंथरवन पिंपरीत पवार कुटूंबावर हल्ला ! एकाची प्रकृती चिंताजनक

## बैलांच्या मिरवणुकीवरून दोन गट भिडले;10जखमी,मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल

बीड (प्रतिनिधी) राज्यात पोळा सन शेतकरी मोठ्या उत्साहाने साजरा करतात परंतु राज्यात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळाचे सावट असल्याने शेतकऱ्यांनी साध्या पद्धतीने बैलपोळा साजरा करण्यात आला.

बीड तालुक्यातील अंथरवण पिंपरी येथे बैलपोळा सणाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या मानाच्या बैलांच्या मिरवणुकीवरून अंथरवन पिंपरी (ता. बीड) येथे दोन गट आमनेसामने आल्याने तुंबळ हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी (दि. १०) घडली. या घटनेत सुमारे १० ते १२ जण जखमी झाल्याची माहिती असून, जखमींवर बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, या घटनेचा मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बैलपोळा सणानिमित्त अंथरवन पिंपरी येथे मानाच्या बैलांची मिरवणूक काढण्यात आली होती. याच मिरवणुकीवरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. वादाचे रूपांतर काही वेळातच हाणामारीत झाले. यावेळी काठ्या व लाठ्यांचा वापर झाल्याचे सांगितले जात असून, काही व्यक्तींना पवार कुटुंबीयांवर हल्ला करत घरात घुसून मारहाण करण्यात आला आहे यामध्ये पवार कुटुंब गंभीर जखमी झाले आहे.

या घटनेत बबन गुलाब पवार, विनायक मुन्ना पवार, विश्वनाथ मुन्ना पवार, पंकज बबन पवार, शेषेकला विश्वनाथ पवार, यशोदा गणेश पवार आणि बायांनाबाई मुन्ना पवार यांच्यासह अन्य व्यक्ती जखमी झाल्याची माहिती आहे.


यातील बबन गुलाब पवार यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असल्याची माहिती असून, त्यांच्यावर बीड येथील खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत आहे.दरम्यान, हाणामारीचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून, त्यामध्ये काही जणांकडून एकमेकांवर हल्ला करताना दिसत असल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बीड जिल्ह्यात सण-उत्सव किंवा किरकोळ वादातून हाणामारीच्या घटना घडण्याचे प्रकार वारंवार समोर येत आहेत. त्यातच घटनांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने या प्रकाराला आणखी प्रसिद्धी मिळत असल्याचे चित्र आहे. अंथरवन पिंपरी येथील घटनेमागील नेमके कारण, हाणामारीत सहभागी व्यक्ती आणि कायदेशीर कारवाईबाबत पोलिसांच्या तपासानंतर अधिक स्पष्टता येणार आहे. या घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर पोलीस अंतरावन पिंपरीत दाखल झाले.

## पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांचा खोडसाळपणा पिक कापणी अहवाल चुकीचा

### पंचायत समितीचे अधिकारी शेतकऱ्यांच्या मुळावर

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यात दुष्काळी परीस्थीती असून पंचायत समिति मार्फत पीक कापणी प्रयोगासाठी सरकारी सर्वे करण्यात आला असून तो चुकीचा आहे.




याविषयी सविस्तर वृत्त असे कि शेतकरी कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटाने पिचलेला आहे. त्यातच सध्या केज तालुक्यात सर्वत्र दुष्काळी परस्थिति असून, पिके पूर्ण पणे करपलेली आहेत. त्यामुळे शेतकरी पूर्ण उदवस्त झाला असून, सरकारी मदतीची गरज आहे, असे असताना ओलितांखालील पीक कापणी सर्वे केले तर शेतकरी मदती पासून वंचित राहतील. असे झाल्यास त्याला आत्महत्या शिवाय पर्याय नाही. तरी मा. साहेबानी लक्ष घालून पंचनामे करून विमा आणि अनुदानाची मदत मिळवून द्यावी ही नम्र विनंती याविषयाचे निवेदन भोपला ग्रामस्थांनी केज तहसीलदार यांना दिले आहे. अन्यथा तिव्र स्वरुपाचे आंदोलन केले जाईल असा निवेदनाद्वारे ईशारा देण्यात आला आहे.

## तुलसी इंग्लिश स्कूलच्या हर्षद शिरसाटची विभागीय वूशू स्पर्धेसाठी निवड

**बीड (प्रतिनिधी) :** मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर तुलसी इंग्लिश स्कूलच्या हर्षद शिरसाट याने जिल्हास्तरीय शालेय वूशू स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.



गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत हर्षदने १७ वर्षे वयोगटातील वूशू क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी केली. या यशामुळे त्याची विभागीय शालेय वूशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

हर्षदच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्या उमा जगतकर, क्रीडा शिक्षक मोसिम शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धनेगाव फाटा येथे मनोज जरांगे पाटील यांना पाठींबा दर्शवत सकल मराठा समाजाकडून एक तास चक्का जाम

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कळंब अंबाजोगाई रोडवर मनोज जरांगे पाटील यांना पाठींबा दर्शवत चलो मुंबई,एक मराठा लाख मराठा, मनोज जरांगे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है च्या घोषणा देत एक तास चक्का जाम आंदोलन करण्यात आले.



तीन वर्षापासून मनोज जरांगे पाटील यांचा मराठा समाजाला आरक्षण मिळावे, न्याय मीळावा लढा सुरू आहे,आजवर आकरा उपोषण करण्यात आले,दोन वेळा गुलाल उधळून हि शासनाने मराठा समाजाची दिशाभूल केली,आज उपोषणाला चौदा दिवस होत असुनही प्रशासनाकडून कसल्याहि प्रकारची दखल घेतली नसल्याने मराठा समाज आक्रमक होत असुन प्रशासनाकडून तात्काळ मागण्या मान्य करत मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य कराव्यात असा आक्रोश,तीव्र वेदना,मराठा समाजाच्या भावना सरकारच्या कानापर्यंत पोहचवा,प्रशासनाच्या कानी घाला असा आवाज,हि मागणी मराठा समाजाकडून करन्यात आली, आजुबाजूच्या सर्व गावातील मराठा समाजातील ग्रामस्थांनी यात सहभाग नोंदवला व प्रशासनाला निवेदनाद्वारे कळवण्यात आले,

मराठा समाज केवळ मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार पुढील पाऊल उचलेल,सकल मराठा समाज मुंबई कडे कुच करण्यासाठी सज्ज झाला असुन केवळ पाटलांचा आदेशाची वाट पाहत आहे,

या पुढील आंदोलन तीव्र करण्याचा इशारा सकल मराठा समाजाकडून देण्यात आला,

या रास्ता रोको आंदोलनात गट तट आपसातील मतभेद विसरून सर्व सकल मराठा समाज एकवटला.

## माने कॉम्प्लेक्स समोरील चौकाला महात्मा गांधी चौक व रस्त्याला महात्मा गांधी मार्ग नाव देण्याची आग्रही मागणी

**बीड प्रतिनिधी दि. 11/09 :** बीड शहरातील नवी भाजी मंडई भागातील सातत्याने कार्यरत असलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्रासाठी शासन निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने बीड नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांना भेट घेऊन निवेदन दिले . माननीय उपनगराध्यक्ष साहेब यांना शासनाच्या जीआर सह निवेदन सादर करण्यात आले. जिव्हाळा बेघर निवारा केंद्राला अद्यापही शासन निधी मिळत नसल्याचे यातून निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच शासन निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेकडून कसल्याही प्रकारची मदत कार्य उपाययोजना मिळत नसल्याचेही सांगण्यात आले. आपल्या नगर परिषदे तर्फे कसल्याही सोयी सुविधा व गरजे नुसार मदत कार्य तिथे केल्या जात नाही हे पण निदर्शनास आणून देण्यात आले. यावर उपनगराध्यक्ष साहेबांनी सकारात्मकतेने सविस्तर पणे परिस्थितीचा आढावा घेत योग्य ती चर्चा करून मार्गदर्शन केले. बेघर निवारा केंद्रासाठी नगरपरिषदे कडून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने आमसभे मध्ये ठराव मांडण्यात येईल यासाठी तात्काळ कार्यवाहीला सुरुवात केली आहे. तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील सद्य परिस्थितीतील सर्व समस्यांची यादी करून घेतली आहे. अशा पद्धतीने उपनगराध्यक्ष विनोद मुळूक साहेब यांनी सकारात्मकपणे सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना करण्यासाठी आश्वासित केले आहे.

याच भेटीमध्ये बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाच्या वतीने अंकुश नगरला जोडलेल्या भागातील कृष्णाई नगर, आगलावे इस्टेट या सर्व परिसरामधील पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच पाईपलाईन दुरुस्ती, नळ कनेक्शन दुरुस्त्या तसेच योग्य दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याचे प्रश्न मांडण्यात आले. या भागांमध्ये पथदिवे अद्यापही लावण्यात आलेले नाहीत हेही निदर्शनास आणून दिले. पथदिव्यां अभावी अंधारामुळे नागरिकांची सातत्याने होत असलेली गैरसोय निदर्शनास आणून देण्यात आली.

# अंबाजोगाईत रोटरी क्लबतर्फे 12 सप्टेंबर रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिर

## नागरिकांनी तपासणी करून घ्यावी : डॉ.नवनाथ घुगे

**अंबाजोगाई :** कॅन्सरचे प्रमाण वाढत असताना वेळीच निदान व्हावे. या उद्देशाने सामाजिक बांधिलकी जपत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने नागरिकांसाठी विशेष मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन १२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते २ या वेळेत आद्यकवी मुकुंदराज सभागृहात करण्यात आले आहे. अशी माहिती प्रोजेक्ट डायरेक्टर प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे यांनी दिली.

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे यासाठी रोटरीची अत्याधुनिक 'रोटरी आशा एक्सप्रेस' ही फिरती व्हॅन अंबाजोगाईत येणार असून त्यात महिलांसाठी अत्याधुनिक थर्मल स्कॅनिंग व कोल्पोस्कोपी तपासणी केली जाणार आहे.

कॅन्सर सुरुवातीच्या टप्प्यात आढळल्यास उपचार करणे अधिक सोपे आणि परिणामकारक ठरते. त्यामुळे शंका असल्यास तपासणी पुढे ढकलू नका.या संधीचा लाभ घ्या.

**या शिबिरात काय तपासले जाणार ? :** थर्मल स्कॅनिंग टेस्ट , स्तनातील गाठीसाठी. कोल्पोस्कोपी गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सर साठी, गुटखा, तंबाखूमुळे तोंडातील, जिभेतील गाठ, चट्टे, जखम याची तपासणी. शरीरावरील गाठी, न भरणारी जखम, घसा तपासणी,

**कॅन्सरची ही लक्षणे दुर्लक्ष करू नका:**

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार - अन्न गिळताना त्रास होणे, गरम थंड पदार्थ खाताना अडचण येणे, दात काढल्यानंतर जखम बरी न होणे, स्तनात गाठ, स्तनाच्या आकारात बदल, अंगावरून पांढरा स्राव किंवा दोन पाळीच्या मध्ये रक्तस्राव, वयाच्या ४५ नंतर पाळी बंद झाल्यानंतर पुन्हा रक्तस्राव, तोंडात सतत जखम, आवाजात बदल, भूक मंदावणे वजन कमी होणे, शरीरात न दुखणारी गाठ, थकवा, धाप लागणे, डोळे, तोंड, नाक, कान, मल-मूत्र द्वारातून वेदनारहित रक्तस्राव ही कर्करोगाची लक्षणे असू शकतात.

या संदर्भात काही अडचण असल्यास अथवा तपासणीसाठी संपर्क साधण्यासाठी आयोजन समिती प्रोजेक्ट चेअर डॉ. नवनाथ घुगे,को-प्रोजेक्ट चेअर डॉ. लतिफ खान पठाण, डॉ. निशिकांत पाचेगावकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष शकील शेख, सचिव राधेश्याम लोहिया,प्रा. संतोष मोहिते, राजेंद्र घोडके यांच्याशी संपर्क साधावा.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई दरवर्षी दिला जाणारा स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार ख्यातनाम कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना जाहीर

**अंबाजोगाई :** यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना घोषित करण्यात आला आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.



यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आंबेजोगाई येथील राजकारणी, समाजकारण, साहित्य, संस्कृती, संगीत,शिक्षण आदी क्षेत्रात उतुंग कार्य केलेले स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी साहित्य, संगीत, पत्रकारिता, सुसंस्कृत राजकारणी, क्रीडा, सिनेमा - नाट्य, शिक्षण आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या एका मान्यवरास हा पुरस्कार स्वर्गीय भगवानराव लोमटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जातो यावर्षी हा १४ वा पुरस्कार सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना दिला जाणार आहे.

मराठी साहित्यविश्वात ग्रामीण जीवनाचे वास्तव, मातीचा सुगंध, शेतकऱ्याच्या घामाची कहाणी, श्रमजीवी माणसाचे दुःख आणि आनंद, तसेच वऱ्हाडी बोलीची अस्सल गोडी आपल्या साहित्यातून प्रभावीपणे व्यक्त करणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ते परिचित आहेत. लेखक, कादंबरीकार, नाटककार, संशोधक, कोशकार, चित्रकार, काव्यगायक आणि सामाजिक भान असलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व त्यांचे आहे. त्यांच्या साहित्याने मराठी ग्रामीण साहित्याला एक वेगळी ओळख आणि नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या प्रसिद्ध “काया मातीत मातीत” या काव्यसंग्रहातील शीर्षकातूनच त्यांच्या काव्यविश्वाचे स्वरूप स्पष्ट होते. त्यांनी इंदौर येथे एम. ए. मराठी शिक्षण घेतले व संत गाडगे बाबा विद्यापीठ नागपूर येथून "पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास" याविषयात पी.एच.डी. प्राप्त झाली.



कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी, गावशिव, पंढरीच्या वाटेवर, काया मातीत मातीत, वैदर्भी, साय, वृषभसूक्त, मातीचा झरतो डोळा, मायबाप हे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. डेबू व डेबूजी प्रमुख कादंबऱ्या आहेत. चित्रपट गीत लेखन, पटकथा लेखन, अंधारयात्रा हे नाटक खूप गाजले होते. पहाडी आवाजात कविता सादर करणारे कवी म्हणून रसिकांना ते आवडतात.

त्यांचा जन्म हिंगणी ता. तेल्हारा जिल्हा अकोला येथे झाला. निवृत्ती नंतर सध्या ते पुण्यात वास्तव्य करतात. त्यांचा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात सुरुवाती पासून सहभाग राहिला आहे. भगवानराव लोमटे व त्यांची मैत्री सर्वश्रुत आहे. विठ्ठल वाघ यांनी महाराष्ट्रभर कवितेचे कार्यक्रम करून भाषा वृध्दी व प्रसाराचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन यावर्षीचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे आहे.

यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण, प्रा. भास्कर चंदनशिव, पद्मश्री डॉ. सतीश आळेकर व डॉ. वासुदेव मुलाटे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

या वर्षीचा चौदावा पुरस्कार कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृह, अंबाजोगाई येथे प्रख्यात साहित्यिक व गांधीवादी विचारवंत प्राचार्य डॉ . विश्वास पाटील, शहादा यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, बीड यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येईल. अशीही माहिती दगडू लोमटे यांनी दिली. या कार्यक्रमास सर्वां नागरिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन, समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा. सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतीश लोमटे, सदस्य सर्वश्री डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. भगवान शिंदे, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक पोखरकर आणि राजपाल लोमटे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# एसआयआर पडताळणी कार्यवाही तत्परतेने पूर्ण करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) कार्यक्रमांतर्गत दावे व हरकतींची कार्यवाही सुरू आहे. एसआयआर अंतर्गत मॅपिंग न झालेल्या तसेच मतदारांच्या नावांमध्ये विसंगती आढळलेल्या नोंदींची दस्तऐवजांच्या आधारे पडताळणीची कार्यवाही निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावी. यासाठी सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी आपापसांत समन्वय ठेवून पडताळणीसाठी प्राप्त कागदपत्रांची तात्काळ तपासणी करून अहवाल सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

एसआयआर अंतर्गत दस्तऐवज पडताळणीसाठी नियुक्त नोडल अधिकाऱ्यांची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी निवडणूक प्रगती चौंडेकर, संबंधित नोडल अधिकारी तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

एसआयआर अंतर्गत मतदार यादीतील नोंदींचे मॅपिंग करण्यासाठी यापूर्वी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. आता मॅपिंग न झालेल्या मतदारांना नोटीस बजावून आवश्यक पुरावे व कागदपत्रांसह पडताळणीसाठी बोलावण्यात येणार आहे. संबंधित मतदारांनी मागणी करण्यात आलेले आवश्यक पुरावे सादर करणे अपेक्षित आहे. प्राप्त कागदपत्रांची संबंधित यंत्रणांनी तातडीने पडताळणी करून ती निवडणूक शाखेकडे सादर करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

या कामासाठी संबंधित यंत्रणांनी आपल्या स्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच एसआयआर पडताळणीसाठी स्वतंत्र ई-मेल तयार करून त्या ई-मेलचा पत्ता आणि नियुक्त नोडल अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक निवडणूक शाखेच्या ई-मेलवर तात्काळ पाठवावा. पडताळणीची संपूर्ण कार्यवाही परस्पर समन्वयाने व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

हिंगोली जिल्ह्यात एसआयआर अंतर्गत सुमारे ३६ हजार मतदारांच्या नोंदींची पडताळणी करावयाची आहे. या मतदारांना नोटिसा बजावून आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून त्यांची पडताळणी करण्यात येणार आहे. प्राप्त कागदपत्रांची ४८ तासांच्या आत पडताळणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत कायम राहावे तसेच मतदार यादी अचूक व अद्ययावत राहावी, यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी जबाबदारीने व समन्वयाने कार्यवाही करावी. निर्धारित कालमर्यादेत पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वांनी प्राधान्याने कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

# औंढ्यात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**




निलंबन व वेतनवाढ बंद करण्याच्या कारवाया रद्द कराव्यात, अतिरिक्त ग्राम पंचायतींचा पदभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त मानधन द्यावे, पदोन्नतीसह विविध प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, या मागण्यांसाठी ग्राम पंचायत अधिकारी युनियनच्या डीएनई १३६ तालुका शाखेच्या वतीने शुक्रवारी (दि. ११) औंढा नागनाथ पंचायत समिती कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या विविध मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचा मुद्दा आंदोलनातून मांडण्यात आला. चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेले निलंबन व बंद केलेली वेतनवाढ याबाबतची कारवाई रद्द करावी. शासन निर्णयानुसार निनावी तसेच पुरावे नसलेल्या तक्रारींची दखल घेऊन चौकशी करू नये. अतिरिक्त ग्रामपंचायतींचा पदभार असलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना शासन निर्णयानुसार अतिरिक्त मानधन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. विभागीय चौकशीत झालेल्या निर्णयांमध्ये सौम्य शिक्षा द्यावी. ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात केवळ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरू नये. शासन निर्णयानुसार पाच वर्षांचे गोपनीय अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावेत, अशीही मागणी आंदोलकांनी केली.

सन २०२२-२३ ते २०२५-२६ या कालावधीतील आदर्श ग्रामसेवक पुरस्कारांची निवड करून तत्काळ पुरस्कार वितरण करावे, ग्रामपंचायत अधिकारी संवर्गातून विस्तार अधिकारी रिक्त पदांवर पदोन्नती द्यावी तसेच १०, २० व ३० वर्षांच्या कालबद्ध पदोन्नतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली. जलजीवन मिशनच्या कामांची चेकलिस्ट व योजनेचे सर्व अभिलेख ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावेत, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत करून द्वितीय प्रत प्रमाणित करून द्यावी तसेच प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करून त्याचा लाभ त्वरित द्यावा, आदी मागण्यांकडेही आंदोलनातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तसेच औंढा नागनाथ पंचायत समिती गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांना निवेदन दिले.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी. एन.ई.१३६ जिल्हाध्यक्ष दिलीप पांढरे, औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष कैलास देशमुख, उपाध्यक्ष रामदास कांबळे, सचिव योगेश इपकलवार, महिला उपाध्यक्ष विनाताई कदम, चंद्रकांत पुंडगे, सुनिल बिनगे, बळीराम खोकले, नितीन पाटील, गंगाप्रसाद गायकवाड, अंबिका चित्तेवार, सचिन जाधव, अमोल करेवार, विष्णु आगलावे, देविदास राठोड ,सदानंद गोंड, दामोदर गोरे, मुकुंद घनसावंत, केशव काळे, राम चौधरी, राम पायघन यांच्या सह औंढा नागनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फेन्सिंगमध्ये चार खेळाडूंची चमकदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**



हिंगोली येथे पार पडलेल्या ज्युनियर जिल्हास्तरीय फेन्सिंग निवड चाचणी व स्पर्धेत गोरेगाव येथील चार खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. विशेष म्हणजे, या चारही खेळाडूंची फॉइल प्रकारात हिंगोली जिल्ह्यातून निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये पायल गजानन कावरखे, सिद्धी गजानन कावरखे, सायली मोहन पाटील आणि सार्थिक सुभाष कावरखे यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील या खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर फेन्सिंगसारख्या क्रीडा प्रकारात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जिल्हास्तरीय निवड चाचणीत दमदार कामगिरी करत त्यांनी गोरेगावसह संपूर्ण हिंगोली जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या खेळाडूंना राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक बजरंग कदम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखालीखेळाडूंनी फेन्सिंगमधील तांत्रिक कौशल्य, शिस्त आणि स्पर्धात्मक तयारीवर मेहनत घेतली.

या यशाबद्दल जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव संजय भुमरे यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य, मुख्याध्यापक संतोष गिरी, पंजाब देवकर, गजानन कावरखे, मोहन पाटील, यशपाल खंडाळे, अशोक भोसले तसेच सर्व शिक्षकवृंदांनी चारही खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण मातीतून घडलेल्या या चार खेळाडूंनी राज्यस्तरावर झेप घेतल्याने परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली आहे.



हिंगोली- बैल पोळ्यानंतर हिंगोलीत कर साजरी करण्यात आली. यानिमित्त शेतकऱ्यांनी बैलांना सजवून शहरातून ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणुक काढली. यावेळी येथील ग्रामदैवत खटकाळी हनुमान मंदिरात बैलांना दर्शनासाठी नेण्यात आले. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### वगरवाडी येथे वाघाई माता मंदिरात उत्सव



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी तांडा येथील बंजारा समाजबांधवांकडून शेकडो वर्षापासून वगरवाडी येथील नॅशनल ढाब्याजवळ असलेल्या वाघाई मातेस भोग लावून मंदिरास बैलांच्या प्रदक्षिणा मारण्यात येतात. दरम्यान हीच शेकडो वषाची परंपरा जपत पोळासणाच्या करनिमित्त शुक्रवारी दि ११सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता वाघाई मातेस भोग चढवून मंदिरास बैलांसह प्रदक्षिणा मारण्यात आल्या. यावेळी महिलांनी पारंपारिक पद्धतीने बंजारा नृत्य सादर केले. यावेळी माजी सरपंच तुकाराम राठोड, अजय राठोड, गोविंद राठोड, बाळू राठोड, गणेश राठोड, फकीरा नाईक, विजय चव्हाण, बंडू चव्हाण, दादाराव जाधव, फकीरा राठोड, विकास जाधव, रमेश राठोड, राजेश राठोड, सुभाष राठोड यांच्यासह महिला-पुरुष यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार दिलीप नाईक, इमरानोद्दीन सिद्दिकी, यांनी बंदोबस्त ठेवला होता.

### आंब्यात कुणबी जात प्रमाणपत्र विशेष शिबीर



हिंगोली- वसमत तालुक्यातील आंबा येथील समाज मंदिरामध्ये कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा पात्र नागरिकांसाठी कुणबी जात प्रमाणपत्र विशेष शिबिर पार पडले. यामध्ये ५२ पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. उपस्थित नागरिकांच्या अडचणी व समस्या जाणून घेत उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी तहसीलदार सारंग चव्हाण आणि नायब तहसीलदार डॉ. विनोद डोंगावकर उपस्थित होते. आंबा मंडळ अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यरत सर्व ग्राम महसूल अधिकारीही शिबिरास उपस्थित होते. शिबिरात १४ व्यक्तींची कागदपत्रे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. त्यांना आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज सादर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, असे प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले.

# शासकीय तंत्रज्ञानिकेतनमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

तांत्रिक कौशल्याबरोबर अंतर व्यक्ती कौशल्य सॉफ्ट स्किल्स विकास करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन समुपदेशक निळकंठ गायकवाड यांनी शासकीय तंत्रज्ञानिकेतन येथे केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य बी. पी देवसरकर अणूविद्युत विभाग प्रमुख प्रा. तडवी पठाण प्रा. टी. एस परोडवाड प्रा. एस. बी. भोसले हे उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. ई. ई. तडवी यांनी प्रास्ताविक केले. निळकंठ गायकवाड यांनी व्यक्तिमत्व विकास व मुलाखत तंत्रे यावर बोलताना सामाजिक कौशल्ये, संभाषण, समस्या निवारण, नेतृत्व विकास, मुलाखत तंत्रे या कौशल्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व ते आत्मसात करून आपले व्यक्तिमत्व विकसित करून यशस्वी आनंदी जीवन कसे जगता येईल याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मानसिक तणावापासून मुक्त कसे होता येईल तसेच रागाचे व्यवस्थापन कसे करावे याविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी प्राचार्य बी.पी. देवसरकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अंतिम वर्षातील अणूविद्युत विभाग तसेच यांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. आभार प्राध्यापक भोसले यांनी मानले.

# धनगर समाजाच्या परभणी येथील महामेळाव्यानिमित्त हिंगोलीत आज बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाला निर्णायक दिशा देण्यासाठी परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या निर्णायक महा मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व समाजबांधवांची महत्त्वपूर्ण बैठक दि १२ सप्टेंबर रोजी होणार असल्याची माहिती धनगर समाज नेते गोपाल सातपुते यांनी दिली.

येथील शासकीय विश्रामगृहात दुपारी १२.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला धनगर समाजाचे नेते दिपक बोऱ्हाडे यांची प्रमुख उपसिथत असणार आहे. यावेळी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत सविस्तर चर्चा, आगामी महा मेळाव्याची नियोजनपूर्व तयारी, समाजबांधवांमध्ये जनजागृती तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी जिल्हा संवाद साधण्यात येणार आहे. यानंतर पत्रकार परिषदही आयोजित करण्यात आली आहे.

परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या निर्णायक महा मेळाव्याला हिंगोली जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी व्हावेत, यासाठी बैठकीत व्यापक नियोजन करण्यात येणार आहे. आरक्षणाचा प्रश्न हा संपूर्ण धनगर समाजाच्या भवितव्याशी निगडित असल्याने पक्ष, गट, तट आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजहितासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सकल धनगर समाज, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच समाजबांधवांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून १७ सप्टेंबरच्या परभणी महा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन धनगर समाज नेते गोपाल सातपुते, सचिन मस्के (नाईक), भगवान पावडे, विष्णू पौळ, पवन पोले, शिवाजी कोल्हे यांनी केले आहे.

# नवमतदारांनी मतदार यादीत नाव नोंदवावे- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कालावधीत पात्र नागरिकांना नवीन मतदार म्हणून नाव नोंदणी, मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती तसेच अपात्र अथवा मृत व्यक्तींचे नाव वगळणीसाठी अर्ज करता येणार आहे. तरी या कालावधीत जिल्ह्यातील पात्र नवमतदारांनी या संधीचा लाभ घेऊन मतदार यादीत आपले नाव नोंदवून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवडणूक उपजिल्हाधिकारी प्रगती चौंडेकर, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्यांची उपस्थिती होती.

ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार यादी पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आलेला नसल्यामुळे दि. १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या अनेक नवमतदारांना मतदार यादीमध्ये नाव नोंदविता आले नव्हते. आता दि. १ ऑक्टोबर २०२६ हा अहर्ताकारी दिनांक निश्चित करण्यात आला असून, या दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

दि. १ ऑक्टोबर २०२६ या अहर्ताकारी दिनांकानुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या आणि अद्याप मतदार म्हणून नोंदणी न झालेल्या युवकांची संख्या मोठी आहे. या युवकांना मतदार नोंदणीची प्रक्रिया सुलभतेने पूर्ण करता यावी, यासाठी महाविद्यालयांच्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या माध्यमातून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत महाविद्यालयांमध्ये ही विशेष शिबिरे घेण्यात येतील. पात्र युवकांनी आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या या शिबिरात सहभागी होऊन मतदार नोंदणीसाठी आवश्यक अर्ज व कागदपत्रे सादर करावीत. महाविद्यालयांनीही शिकवणी वर्गांदरम्यान विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीबाबत माहिती द्यावी आणि पात्र नवमतदारांची जास्तीत जास्त नोंदणी होण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. महाविद्यालयांनी मतदार नोंदणीसाठी महाविद्यालय स्तरावर विशेष उपक्रम राबवावेत. जनजागृतीवर भर द्यावा जेणेकरुन जास्तीत जास्त नवमतदार नोंदणी होईल अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

नवीन मतदार नोंदणीसाठीचा नमुना-६ जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोलीच्या संकेतस्थळावर 'निवडणूक विभाग' या मथळ्याखाली उपलब्ध करून देण्यात आला आहे. पात्र नागरिकांनी नमुना-६ भरून मतदार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी. लोकशाही प्रक्रियेत मतदानाचा अधिकार हा प्रत्येक पात्र नागरिकाचा महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व पात्र युवकांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवून घ्यावे. तसेच मतदार यादीतील आपली नोंद तपासून आवश्यक असल्यास दुरुस्ती करून घ्यावी आणि विशेष सखोल पुनरिक्षणाच्या दावे व हरकती कालावधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# आडगाव बाजार मंडळ दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** आडगाव बाजार मंडळ डोंगराळ भाग आहे त्यामुळे या परिसरातील शेतकरी मागील दीड महिन्यापासून परिसरात समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसाचा दीर्घ खंड पडल्यामुळे खरीप हंगामातील पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

पावसाअभावी सोयाबीन पिके वाळून जाण्याच्या स्थितीत आहेत. कापूस पिकाची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. तसेच तूर सोयाबीन कापूस उडीद मूग पिकावरही पावसाअभावी विपरीत परिणाम होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरी यासाठी मोठा खर्च केला आहे; मात्र पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने हा खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर कर्जफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह, पुढील हंगामासाठी लागणारा खर्च आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सद्यस्थितीचा गांभीर्याने विचार करून आडगाव बाजार मंडळ तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावे, ही आमची प्रमुख मागणी आहे. आडगाव मंडळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्याची मागणी या भागात शेतकऱ्यांनी परभणीचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे मागण्या तातडीने मान्य करण्यात याव्यात :

आडगाव बाजार मंडळातील दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पीक नुकसानीचे पंचनामे करावेत. सोयाबीन, कापूस व तूर पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून पात्र शेतकऱ्यांना सरसकट व तातडीने आर्थिक अनुदान देण्यात यावे.

बाधित शेतकऱ्यांना पीकविमा योजनेचा लाभ तातडीने मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन शासनाच्या दुष्काळी मदतीच्या सर्व उपाययोजना त्वरित लागू कराव्यात.आशा मागण्या सर्वांचे जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आले आहेत या निवेदनावर खालील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत प्रल्हादराव दाभाडे चेअरमन आडगाव बाजार नारायण दाभाडे शंकर दाभाडे नितीन दाभाडे सुभाष देशमुख चंद्रकांत चित्रे विलास चव्हाण गोपाल गडदे आदींच्या स्वाक्षरी आहे



## महसूल सेवकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनाकडे साकडे



**पूर्णा,/प्रतिनिधी-** महसूल विभागातील महसूल सेवक (कोतवाल) संवर्गाच्या राज्यस्तरीय प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघाच्या परभणी जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष अमोल भिसे यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन सादर करण्यात आले.

महसूल सेवकांच्या विविध मागण्या शासनदरबारी प्रलंबित असून, त्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शिपाई संवर्गातील पदोन्नतीचा ४० टक्के कोटा पूर्ववत सुरू करण्यात यावा, तसेच महसूलमंत्री यांनी जाहीर केलेले ग्राम महसूल अधिकारी पदासाठीचे २० टक्के आरक्षण जुलै २०२६ च्या एमपीएससी जाहिरातीत समाविष्ट करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी आहे.महसूल सेवक अर्थात कोतवाल हे पद स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असून, १९९७ पासून कर्मचारी महसूल विभागात प्रदीर्घ सेवा बजावत आहेत. मात्र, पदोन्नतीसाठी पात्रता नसणे अथवा वयोमर्यादेमुळे अनेक कर्मचाऱ्यांना विभागीय परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाते. त्यामुळे सेवाज्येष्ठ महसूल सेवकांच्या भविष्यासाठी शासनाने योग्य तरतूद करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच कोरोना काळात मृत्यू झालेल्या कोतवालांच्या अनुकंपा नियुक्तीबाबतचा शासन निर्णय कोरोना काळापासून लागू करण्यात यावा आणि मृत महसूल सेवकांच्या जागी वारसांना सरळ नियुक्ती देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.प्रलंबित मागण्यांमुळे राज्यभरातील महसूल सेवकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, त्यांच्या भविष्याचा विचार करून शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. परभणी जिल्ह्यातील सर्व महसूल सेवकांच्या वतीने शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून न्याय द्यावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी राज्याध्यक्ष शिवप्रसाद देवणे, जिल्हाध्यक्ष अमोल भिसे,उपाध्यक्ष रामेश्वर चातरवाड, गोविंद ढगे, अनिल राऊत, संतोष रानगिरे, कैलास मराळे, नारायण चव्हाण, आकाश सूर्यवंशी, विठोबा होरगुळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## येलदरीत ६२.४२ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ३४.७० टक्के साठा

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील महत्त्वाच्या येलदरी आणि सिद्धेश्वर धरणातील पाणीसाठ्याची स्थिती ९ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता जाहीर करण्यात आली. त्यानुसार येलदरी धरणात ६२.४२ टक्के, तर सिद्धेश्वर धरणात ३४.७० टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे.

## बी. रघुनाथ यांच्या साहित्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक : नरवाडकर

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** कवीवर्य बी. रघुनाथ यांच्या साहित्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे मत कवीवर्य बी. रघुनाथ यांच्या कन्या सुधाताई नरवाडकर यांनी व्यक्त केले.

बी. रघुनाथ यांच्या 'पुन्हा नभाच्या लाल कडा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन रविवारी (दि. ६) शहरातील गणेश वाचनालय येथे सुधाताई नरवाडकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. मंगेश नरवाडकर, राजेश नरवाडकर, इंजि. पद्मजा अलुरकर, कवी इंद्रजित भालेराव, संयोजक श्रीकांत उमरीकर, ज्येष्ठ विधिज्ञ अशोक सोनी, वसेकर सर आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना नरवाडकर यांनी वडिलांचा सहवास लाभला नसल्याची खंत व्यक्त केली. मात्र, त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचा वारसा लाभल्याबद्दल त्यांनी धन्यता व्यक्त केली. वडिलांच्या साहित्यिक मोठेपणाचा अभिमान असून, त्यांच्या साहित्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वारसाहक्काने मी जरी बी. रघुनाथांची कन्या असले, तरी खरा साहित्यिक वारसा श्रीकांत उमरीकर व कवी इंद्रजित भालेराव हे जपत आहेत, असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

## वेदमूर्ती उमेश अनंतमहाराज टाकळीकर यांना 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार'

**पूर्णा,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' वेदमूर्ती श्री. उमेश अनंतमहाराज टाकळीकर यांना जाहीर झाला आहे. प्राचीन भारतीय संस्कृती, वेदविद्या, ज्ञानपरंपरा तसेच गुरुकुल शिक्षण पद्धतीच्या संवर्धनासाठी त्यांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ केलेल्या उल्लेखनीय कार्याची शासनाने दखल घेतली आहे.



तालुक्यातील श्रीसद्गुरू वेंकटेश दाजीमहाराज संस्थान, श्रीक्षेत्र टाकळीचे संस्थानाधिपती असलेल्या वेदमूर्ती उमेश महाराज टाकळीकर यांनी अविरतपणे वेदाध्यापन, गुरुकुलाची उभारणी, गोरक्षण तसेच विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्यातून प्राचीन वैदिक ज्ञानपरंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम झाले आहे.

उमेश महाराजांनी ऋग्वेद संहिता, शिक्षा चतुष्टय, अष्टाध्यायी, तर्कसंग्रह, ऐतरेय ब्राह्मण, आरण्यक, पदपाठ, क्रमपाठ, जटापाठ ते घनपाठ तसेच श्रौत, निरुक्त, गृह्यसूत्र आणि ऋग्वेद कर्मकांड अशा षडंगांसहित सखोल वेदाध्ययन पूर्ण केले आहे. वे.शा.सं. काशीनाथशास्त्री जोशी गुरुजी (शंकराचार्य मठ, सातारा), वेदमूर्ती गजानन अनंत भागवत गुरुजी, वेदमूर्ती विनायकभट्ट सीतारामभट्ट आठल्ये गुरुजी (वेदशाळा, रत्नागिरी) आणि वेदमूर्ती प्रभाकर दत्तंभट्ट कोडणीकर गुरुजी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. वेदविद्येचा व्यापक प्रसार व्हावा यासाठी त्यांनी रत्नागिरी, बासर, सातारा (आंध्रप्रदेश) आणि पुणे येथे गुरुकुलाच्या शाखा यशस्वीपणे चालविल्या. त्यांच्या गुरुकुलातून आतापर्यंत ५०० हून अधिक शिष्यांनी अध्ययन केले आहे. विशेष म्हणजे वैदिक शिक्षणासोबतच शालेय व आधुनिक शिक्षणाची सांगड घालत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर त्यांनी भर दिला. वेदविद्या, संस्कृत, गुरुकुल शिक्षण आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या संवर्धनासाठी केलेल्या या प्रदीर्घ कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने वेदमूर्ती विभागातील 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' त्यांना जाहीर केला आहे. या पुरस्कारामुळे संस्कृत, वेदाध्ययन, वैदिक व शैक्षणिक क्षेत्रातून समाधान व्यक्त होत असून विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून वेदमूर्ती उमेश महाराज टाकळीकर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### माणसाने साधे जीवन जगत आनंदी राहिले पाहिजे- डॉ. पवन चांडक

**परभणी,/प्रतिनिधी :** माणसाने साधे जीवन जगत आनंदी राहिले पाहिजे. निसर्ग माणसाच्या गरजा पूर्ण करू शकतो; मात्र माणसाचा हव्यास पूर्ण करू शकत नाही. आनंदी जीवन जगण्यासाठी मोजक्या गरजांचीच आवश्यकता असते. हेन्री डेव्हिड थोरो यांनी 'वाल्डन' या ग्रंथातून हाच जीवनविचार मांडला आहे. थोरो यांचे विचार केवळ वाचण्यापुरते मर्यादित नसून, ते आनंदी जगण्याचा वस्तुपाठ आहेत, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. पवन चांडक यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालयाच्या वतीने आयोजित 'एक दिवस एक पुस्तक' या उपक्रमाचे ४४ वे पुष्प मंगळवारी (दि. ८) गुंफण्यात आले. यावेळी हेन्री डेव्हिड थोरो यांच्या 'वाल्डन' या ग्रंथातील विचारांवर डॉ. चांडक यांनी मंथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष कुलकर्णी होते. साधेपणा, निसर्गाशी असलेले नाते, गरजा आणि हव्यास यातील फरक तसेच आनंदी जीवनाची संकल्पना यावर डॉ. चांडक यांनी विचार मांडले. जगाला बदलायचे असेल तर त्याची सुरुवात प्रथम स्वतःपासून झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी 'ग्रंथ सखा' पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. पवन चांडक यांचा विशेष सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद परभणीचा 'जिल्हा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल षडानन देशमाने, दीपस्तंभ प्रतिष्ठानचा 'उपक्रमशील शिक्षक पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल कीर्ती राऊत व योगेश पंडित, तसेच सामाजिक कार्याबद्दल 'बी द चेंज' पुरस्कार मिळाल्याबद्दल रामराव गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. महेशराव खारकर, चंद्रशेखर मुळावेकर, रमा बाहेती आणि प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या हस्ते हे सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद ठाकर यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मण गाडेकर यांनी केले, तर आम्रपाली खाजेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी उदय जाधव, गणेश ससाने, दीपक गजभारे, वसंतराव काकडे, मंदिर जुमडे, शिवाजी बेंद्रे, प्रकाश धामणगावकर, विजय मंत्री, आप्पासाहेब गाडेकर, डॉ. मकरंद बोंठे, रघुनाथ देशमुख, सर्जेराव लहाने, के. जी. कुलकर्णी, प्रमोद देशमुख यांच्यासह शहरातील वाचक व श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधव गव्हाणे, दिगंबर खुळे, सुयोग साळवे आदींनी पुढाकार घेतला.

### वरपूडकर महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाची क्रॉस कंट्री स्पर्धेत द्वितीय क्रमांकाची कामगिरी : चारही खेळाडूंची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघात निवड

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने ९ सप्टेंबर रोजी आयोजित विद्यापीठस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेत कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनपेठच्या मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत सांघिक द्वितीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत कोमल राठोड, वर्षा राठोड, ऐश्वर्या चव्हाण व वैष्णवी जाधव यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. चारही खेळाडूंनी १० किलोमीटरचे अंतर उत्कृष्ट वेळेत पूर्ण करून संघाला द्वितीय क्रमांक मिळवून दिला. वैष्णवी जाधव यांनी वैयक्तिक द्वितीय, वर्षा राठोड यांनी तृतीय, कोमल राठोड यांनी चतुर्थ, तर ऐश्वर्या चव्हाण यांनी पंचम क्रमांक मिळवला. त्यांच्या कामगिरीमुळे अंतिम सहा खेळाडूंमध्ये त्यांची निवड झाली असून, महाविद्यालयाला ट्रॉफी व पदके मिळाली.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर चारही खेळाडूंची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. त्यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे. या यशाबद्दल हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा सोनपेठ नगरपरिषदेचे नगराध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते व क्रीडा संचालक डॉ. गोविंद वाकणकर यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. मुकुंदराज पाटील, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. संतोष रणखांब, डॉ. अशोक जाधव, डॉ. अंगद फाजगे, डॉ. अनंत सरकाळे, डॉ. संदीप देवराये, प्रा. संतोष वडकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

### तरोडा येथे पाण्याच्या टाकीवर चढून शेतकऱ्यांचे 'शोले स्टाईल' आंदोलन : दुष्काळ जाहीर करण्यासह नुकसानभरपाई, पीकविम्यासाठी आक्रमक पवित्रा



**परभणी,/प्रतिनिधी:** मागील महिनाभरापासून पावसाचा खंड पडल्याने जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पाश्वभूमीवर तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी तालुक्यातील तरोडा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गुरुवारी (दि. २०) पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन करण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला पोळा सणही यंदा साजरा न करता ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोळ्याला फाटा देत हे आंदोलन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी पाण्याच्या टाकीवर चढून 'कोरडा दुष्काळ जाहीर करा', अशा घोषणा दिल्या.

पावसाअभावी पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, पीकविम्याची नुकसानभरपाई मिळवून द्यावी, तसेच दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदत जाहीर करावी, शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

दरम्यान, तरोडा ग्रामस्थांनी मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनालाही पाठिंबा व्यक्त केला. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्या मान्य कराव्यात, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली.

या आंदोलनात किशोर ढगे, गजानन तुरे, विकास भोपळे, गजानन दुगाणे, जाफर तरोडेकर, सुदाम शेळके, नारायण सोळंके, मुरलीधर शेळके, गफार शेख, नारायण शेळके, सुरेश शेळके, सिद्धेश्वर शेळके यांच्यासह तरोडा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जिंतूरमध्ये बंजारा समाजाचा तीज महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**दहा दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल; महिला, समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** समस्त गोर बंजारा समाजाच्या वतीने जिंतूर शहरात आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय तीज महोत्सवाची मंगळवारी (ता. ८) उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. पारंपरिक तीज संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करत या महोत्सवात विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल होती. महिला व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

बंजारा समाजात तीज महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो जिंतूर शहरात चार वर्षापूर्वी अँड विनोद राठोड नाईक यांच्या संकल्पनेतून महोत्सवाची सुरुवात करण्यात आलेली होती. दि ३० ऑगस्ट रोजी अविवाहित मुलींच्या हस्ते तीज पेरणीने झाली. त्यानंतर दररोज विविध कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमासाठी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य रोहित चव्हाण यांचे विशेष योगदान राहिले त्यांनी मंगल कार्यालय उपलब्ध करून दिले. चव्हाण कलेक्शन आणि स्वरूप साडी सेंटर चे रमेश चव्हाण यांच्या वतीने 'होम मिनिस्टर- खेळ पैठणीचा' कार्यक्रम झाला. सुधाकर जाधव यांच्या पुढाकारातून प्रसिद्ध कलाकार गीतांजलीबाई यांचा कार्यक्रम, पोखरणी तांड्यातील हास्य कलाकार सुनील जाधव यांचाही दमदार कार्यक्रम झाला तर इतर दिवसात महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले होते. डॉ. अतुल जाधव यांच्या पुढाकारातून लिंबाळा तांड्यातील महिला पथकांचा ढंभोळी कार्यक्रम व तीज पूजन झाले. दररोज सायंकाळी सात ते दहा या वेळेत संगीत रजनीने महोत्सवाची रंगत वाढविली. शेवटच्या दिवशी मुलीच्या हाताने तिज तोडणी करून विधीवत तीज विसर्जन करण्यात आले. राहुल पवार आणि अनिकेत राठोड यांनी सहकार्य केले.



बंजारा समाजातील सर्व घटकांचा समावेश असल्याने कार्यक्रम छान झाला. दरवर्षीप्रमाणे दहा दिवस अन्नदानाचीही व्यवस्था करण्यात आली.

निसर्गाच्या कुशीत वाढलेला आणि नेहमीच पर्यावरणप्रेमी राहिलेला आपला बंजारा समाज या पवित्र तीज महोत्सवाच्या माध्यमातून वृक्षवल्ली व निसर्गाची पूजा करून आपली प्राचीन संस्कृती आणि अस्मितेचा बाणा अत्यंत अभिमानाने जपतो. तीजमुळे महिलांना आपली कला सादर करण्यासाठी सुंदर व्यासपीठ उपलब्ध होते आणि याद्वारे नवीन पिढीला तसेच इतर समाजालाही बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेची ओळख होते. अशाप्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केल्याने संपूर्ण समाजात एक नवी ऊर्जा आणि चैतन्य निर्माण होते.

_ सौ. सविता राठोड नाईक

महिलांसाठी दहा दिवस सांस्कृतिक कार्यक्रम आणि अन्नदानाची यवस्था तीज महोत्सवात महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग राहावा यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले तसेच त्यांना घरी स्वयंपाकाचा त्रास होऊ नये, यासाठी महोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत दररोज अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाला समाजबांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रामराव चव्हाण, मुकुंद चव्हाण, नामदेव चव्हाण, विलास चव्हाण, रोहित चव्हाण,रमेश वैजनाथ चव्हाण, नामदेव जाधव, विष्णू राठोड , सुधाकर जाधव, उमेश चव्हाण ,डी. यू. राठोड, डॉ. ज्ञानेश्वर राठोड, रमेश गोविंदराव चव्हाण , रंगनाथ राठोड, प्रशांत राठोड,राजेश चव्हाण सर, सचिन राठोड,संतोष काळू चव्हाण, राहुल पवार, संतोष चव्हाण,डॉ. अतुल जाधव, नकुल जाधव, प्रकाश सवाईराम चव्हाण, स्वप्निल राठोड व नितीन जाधव यांनी अन्नदानासाठी योगदान देत सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या सहकार्यामुळे महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिला व समाजबांधवांसाठी दररोज भोजनाची व्यवस्था सुरळीतपणे पार पडली.

कार्यक्रमसाठी शंकर जाधव,, श्याम पवार, पांडुरंग आढे, विकास जाधव,टी के चव्हाण, भागवत चव्हाण, पंकज चव्हाण, सचिन आढे,नितीन चव्हाण, प्रवीण चव्हाण, सचिन राठोड,बंटी राठोड, आकाश राठोड ,अविनाश चव्हाण, सुजित चव्हाण, शैलेश राठोड, रोहन चव्हाण, रितेश चव्हाण, रोहन जाधव , नकुल जाधव, संदीप राठोड, मनोज चव्हाण, अतुल आढे,नितीन आढे, आशिष राठोड, रवी राठोड, विजय राठोड, निशांत जाधव,अजय पवार आदींनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

www.tarunbharat.net
तरुण भारत
# धर्म अध्यात्म
७ | शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६
संयोजक : शिल्पा विवेक कवठेकर/९८२३२६४६२६

# गणेशोत्सवाचे पावित्र्य जपू




पंकज वसंत पाटील
९८५०४३०५७९

घराघरांत पोहोचलेले आणि खऱ्या अर्थाने लोकदेव ठरलेले आराध्यदैवत म्हणजे श्रीगणेश. गणेशोत्सव म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या मनाचा एक हळवा कोपरा! अत्यंत श्रद्धेने आणि भक्तिभावाने हा सण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. सार्वजनिक गणेशोत्सवांच्या बरोबरीने घरोघरी लक्षावधी बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. आपणा सर्वांना आता बाप्पाच्या आगमनाची आतुरता लागली आहे. त्यांच्या स्वागताची लगबग घराघरात सुरू झाली आहे. लवकरच गणराज येतील आणि त्यांच्या आगमनाने चराचरात उत्साह व चैतन्याचे वातावरण निर्माण होईल.

सार्वजनिक गणेशोत्सवामुळे समाजात आपुलकी, सहकार्य आणि एकोप्याचे वातावरण निर्माण होते. रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व, गायन-वादन, विविध मैदानी व बौद्धिक खेळ, निबंध आणि वेशभूशा स्पर्धांमधून बालगोपालांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो. महिलाही आरती, गरबा, गीतस्पर्धा, संगीत खुर्ची अशा उपक्रमांत सहभागी होऊन दैनंदिन जीवनातील ताणतणाव काही काळ विसरतात. हार-फुले विक्रेते, मंडप उभारणारे कारागीर, कलाकार, वादक आणि इतर अनेकांना रोजगाराच्या संधी मिळतात. अनेक गणेश मंडळे रक्तदान, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण यासारखे समाजोपयोगी उपक्रम राबवतात. त्यामुळे गणेशोत्सव हा स्थानिक कला, संस्कृती आणि कलाकारांच्या प्रतिभेला व्यासपीठ देणारा लोकोत्सवही ठरतो.

मात्र, गेल्या काही वर्षांत या लोकोत्सवाचे मूळ स्वरूप काही ठिकाणी बदलत चालल्याचे चित्र दिसते. कुठे गणेशोत्सवाच्या नावाखाली सक्तीची वर्गणीवसुली, कुठे मूर्तीच्या उंचीची अनावश्यक स्पर्धा, कुठे अवाजवी राजकीय हस्तक्षेप, तर कुठे कर्णकर्कश आवाज आणि अनाठायी धांगडधिंगा दिसतो. डीजेचा गोंगाट आणि मोठमोठ्या आवाजातील संगीत पाहिले-ऐकले की, आपण बाप्पाच्या सान्निध्यात नक्की काय अनुभवत आहोत, हे समजेनासे होते. विसर्जन मिरवणुकीतील प्रचंड गर्दी व वाहतूक कोंडीमुळे अपघातांचा धोकाही निर्माण होतो. वर्गणी ही स्वेच्छेची असावी आणि जमा-खर्चाचा पारदर्शक हिशेब नागरिकांसमोर मांडला जावा. या सगळ्या चित्रातून काहीतरी गंभीरपणे चुकत असल्याची जाणीव होते. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवाबाबत काही लोकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. याचा बाप्पांचे भक्त म्हणून आपण गांभीऱ्याने विचार करायला हवा. यंदाच्या उत्सवात काही सकारात्मक बदल करण्याचा संकल्प करूया. डीजेऐवजी भजनी मंडळे, ढोल-ताशे, डफ आणि इतर पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देऊया. विसर्जन मिरवणूक ही भक्तीची अभिव्यक्ती असावी; शक्तिप्रदर्शनाची नव्हे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या मूर्तीचा आग्रह धरूया. कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करून नैसर्गिक जलस्त्रोतांचे रक्षण करूया. निर्माल्य पाण्यात न टाकता त्यापासून कंपोस्ट खत तयार करूया. वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाला चालना देऊया.


सार्वजनिक गणेश मंडप हा केवळ सजावटीचा परिसर न राहता काही दिवसांची संस्कारशाळा बनू शकतो. बालकांना पर्यावरण, स्वच्छता, शिस्त, सहकार्य, वाचन, कला आणि सामाजिक संवेदनशीलतेचे धडे देण्याची संधी या माध्यमातून मिळू शकते. महिला व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग अधिक सन्मानपूर्वक आणि सुरक्षितपणे वाढविण्यासाठी मंडळांनी विशेष काळजी घ्यावी. मूर्तीची उंची वाढविण्यापेक्षा मंडळाच्या सामाजिक कार्याची उंची वाढविण्याची स्पर्धा व्हावी. उत्सवाच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रक्तदान आणि आरोग्यविषयक उपक्रम यांना प्राधान्य दिले, तर गणेशोत्सवाची सामाजिक फलश्रुती अधिक व्यापक होईल. गणपती म्हणजे केवळ एका उत्सवाची आराध्य मूर्ती नव्हे, तर विवेक, बुद्धी, विद्या, कला आणि सदाचाराचे प्रतीक असलेले गणेशतत्त्व आहे. म्हणूनच गणेशोत्सवातील भक्तीचा खरा अर्थ आपल्या आचरणात विवेक, संयम आणि संवेदनशीलता आणण्यात आहे. बाप्पा केवळ मंडपात दिसू नयेत; त्यांची बुद्धी, विवेक, संयम आणि संस्कार आपल्या आचरणातही दिसायला हवेत. तरुण पिढीकडून बुद्धिदाते गणपती बाप्पांच्या पूजेतील विवेक आणि संस्कारांचा विसर पडेल, असे कोणतेही वर्तन होऊ नये, याची दक्षता घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

अक्षरब्रह्म, चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचे अधिपती असलेले श्रीगणेश हे ज्ञान, सर्जनशीलता आणि सद्बुद्धीचे प्रतीक आहेत. म्हणूनच त्यांच्या पूजेचे सार केवळ विधीमध्ये नसून, कल्याणकारी आचरणात आहे. ज्ञानेश्वर माउलींनी 'देवा तुचि गणेशु। सकलमतिप्रकाशु।' असे म्हणून ज्या गणरायाला भक्तीभावाने नमन केले, ते सुखकर्ता-दुःखहर्ता श्रीगणेश प्रत्येकाच्या तनामनाला चैतन्य देणारे लोकदेव आहेत. समाजातील प्रत्येक स्तरातील जनमानसाच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या या लोकदेवतेच्या उत्सवाचे पावित्र्य जपणे हीच खरी गणेशभक्ती ठरेल.

गणेशोत्सव किती मोठा झाला, यापेक्षा तो किती अर्थपूर्ण झाला, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. सजावट, रोषणाई आणि आवाजापेक्षा भक्ती, संस्कार, सेवा आणि पर्यावरणप्रेम यांना महत्त्व देणारा गणेशोत्सवच खऱ्या अर्थाने गणरायाला प्रिय ठरेल. आपल्या मनातील श्रद्धा केवळ पूजेपुरती न राहता ती आचरणातून दिसली, तरच या उत्सवाचे खरे सार्थक होईल. हे बुद्धिदात्या गणराया, सर्वांना सद्बुद्धी, उत्तम शिक्षण, सुख-शांती, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभू दे. आपल्या उत्सवातून भक्तीबरोबरच संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेमाची ज्योत तेवत राहू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना.

गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!

# कर्मोपासक संत : सेना महाराज



संत सेना महाराज 'सेना न्हावी' म्हणून वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे. आपल्या वंशपरंपरागत न्हाव्ह्याचा व्यवसाय सेवा म्हणून करताना संत सेना महाराजांनी भक्ती मार्गही मोठ्या प्रेमाने, श्रद्धेने चोखाळला. इतर संताप्रमाणे जातीभेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून प्रत्येकांची सेवा करण्याची तयारी संत सेना महाराज आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून करीत होते. त्यांच्या कार्याद्वारे त्यांचा परमार्थ दृष्टीस पडतो. संत ज्ञानदेव-नामदेवांचे स्थान वारकरी संप्रदायात अतिउच्च पातळीवर असताना संत सेनांचे कार्य महान भक्तिपरंपरेला वाहून घेणाऱ्या संत मंडळींच्या प्रभावळीतील आहे.

शशिकांत तोटे
९१३०८३५४५८

**'आम्ही वारीक वारीक,**
**करू हजामत बारीक।**
**विवेक दर्पण आयना दावू,**
**वैराग्य चिमटा हालवू।**
**उदक शांती डोई घोळू,**
**अहंकाराची शेंडी पिळू।**
**भावार्थाच्या बगला झाडू,**
**क्राम कोध नखे काढू।**
**चौवर्णा देऊनि हात,**
**सेना राहिला निवांत।।'**

संत सावता माळ्यांप्रमाणेच संत सेना महाराजांचा कर्म आणि भक्तियोगाचा संयोग दृष्टीस पडतो. जो त्यांच्या कृती व वाङमयातून स्पष्ट होतो. उपरोक्त अभंगरचनेचा भावार्थ लक्षात घेता संत सेना महाराज नाभिक व्यवसाय करताना सामान्यजनांच्या मनातील बारीक-सारीक विकार, अहंकाराची हजामत करण्यासाठी तीव्र मनिषा व्यक्त करतात. ते विवेकाचा आरसा दाखवून वैराग्याच्या चिमट्याने मनातील वाईट गोष्टी दूर करतील. शांतीरूपी उदकाने त्यांचे डोळे धुतील. अहंकाराची शेंडी पिळतील. भावार्थांच्या बगला झाडून काम, क्रोधांसारख्या षडविकारांना दूर करतील. शेवटी चारही वर्णांच्या म्हणजेच सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्र आणून शांतपणे राहतील, हे सद्गुण आणि सामर्थ्य संतांच्या ठायी असतात. जणू संतांचा स्थायीभावचं मानावा. एकंदरीत संतांच्या अभंगरचना समाजाला भक्तीचा सोपान, दुष्ट विचारांपासून अलिप्त ठेवते. दूषित मनाचे क्षालन आणि आत्मिक उन्नतीसाठी असतात.

संत सेना विठ्ठलाचे परमभक्त. भगवंताचा कृपाप्रसाद आणि आशीर्वादाचे दान पदरी पाडण्याचे एकमेव साधन, नवविधा भक्तीपैकी नामस्मरण! श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणात संत सेना दंग राहात असत. संत नामदेवांप्रमाणे संत सेनांनी सुद्धा उत्तर भारतापासून तर महाराष्ट्रपर्यंत तीर्थाटने करून भक्तीपरंपरा समृद्ध केली. ते नेमाने पंढरीची वारी करायचे. पंढरीच्या वारीवर त्यांचे अनेक अभंगे प्रसिद्ध आहेत. संत नामदेव, ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव, चोखामेळा, जनाबाई या संतांच्या समकालीन संत होते. या संतांचा सहवास सेनांना लाभलेली मोठी परमार्थांक मिळकत मानली पाहिजे. महान संतांच्या सहवासाने ते स्वतःला भाग्यवंत समजतात. संत ज्ञानेश्वरांमुळे मी घडलो असेही मानतात. संत ज्ञानेश्वरांना ते गुरू मानतात, अशा आशयाची एक अभंगरचना सुद्धा आहे.

**'ज्ञानदेव गुरू ज्ञानदेव तारू,**
**उत्तरील पैलपारू ज्ञानदेव।**
**ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता,**
**तोडील भवव्यथा ज्ञानदेव।**
**ज्ञानदेव माझे सोयरे धायरे,**
**जिवलग निर्धारे ज्ञानदेव।**
**सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान,**
**दाविली निज खूण ज्ञानदेवे।।'**

संत सेना महाराजांच्या बाबतीत चरित्रकारांनी त्यांचा जन्म महाराष्ट्राबाहेर झाला, असे म्हटले आहे. परंतु ते अधिकाधिक काळ हा महाराष्ट्रात सक्रिय राहिले. उत्तर भारतातील राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश प्रांतात त्यांची तीर्थाटने झालीत. शेवटी मध्य प्रदेशात बांधवगड येथे विरक्तवृत्तीने राहून पांडुरंगाच्या नामस्मरण करीत राहिले व तिथेच निराकाराची समाधी लागली. संत सेना महाराजांच्या जीवन यात्रेच्या समाप्तीला संत निळोबारायांनी रचलेली अभंगरचना पुढीलप्रमाणे आहे.

**'जय जयाजी विष्णूदासा,**
**भक्तिभाव तुझा कैसा।**
**जन्मोनि न्हावीयांच्या वंशी,**
**भक्ती केली तूवा भोळी।**
**प्रत्यक्ष पूर्णब्रह्म दावी,**
**राजयासी आरसा।**
**दावियेले कौतुक,**
**देव पूजेचिये वेळी।**
**श्रावण वद्य द्वादशी,**
**सेना बैसला समाधीसी।**
**निळा शरण प्रेमभावे,**
**विष्णुदास सेनियासी।।'**



## कथा गजाननाच्या

तारा प्रद्युम्न देशपांडे/८४५९०७२८४९

# गुरूभक्तीची सत्त्वपरीक्षा

शेगावामध्ये एक पीतांबर नावाचा समर्थांचा भक्त मठामध्ये राहात होता. त्याने समर्थांची खूप सेवा केली. ती सेवा पण फळाला आली. एक दिवस पीतांबराचे फाटके तुटके नेसलेले वस्त्र पाहून समर्थ त्याला म्हणाले, 'तुझे नाव पीतांबर आहे, पण तुला नेसायला धड धोतर पण नाही. नाव पाहता गंगाबाई आणि तडफडे तहानेने, तसलाच हा प्रकार आहे. हे फाटके धोतर पोतेऱ्याच्या उपयोगाचे आहे. हा घे दुपट्टा, तुला नेसण्यासाठी देतो. कोणी काहीही बोलले तरी हा दुपट्टा नेसूनच राहा. त्याला अजिबात सोडू नको.' श्री गजानन महाराजांचे भक्त पुष्कळ पण खरे भक्त हातावर मोजण्याइतके होते. त्यांचे शिष्यमंडळीतले काही शिष्य पीतांबराला टोचून बोलू लागले. समर्थांच्या उपयोगाचा दुपट्टा तू नेसून बसला. हेच तुझं शिष्यपण आहे का? तुझी भक्ती करून झाली आता. तू या ठिकाणी राहू नको. त्याने समर्थांचा अपमान होईल.

पीतांबर म्हणाला, 'मी त्यांचा अपमान केला नाही. उलट मी त्यांचा मान राखला आहे. त्यांनीच मला आज्ञा केली की, हा दुपट्टा तू नेस.' अशी बोलाचाली झाली. भक्तांमध्ये वाद होऊ लागले. ते मिटवण्यासाठी पीतांबरास समर्थ म्हणाले, 'आता तू येथून दूर निघून जा. मूल मोठे झाले की आई त्यास दूर ठेवते. तसेच तू निघून जा. माझी तुझ्यावर कृपा आहे.' पीतांबर डोळ्यांत पाणी आणून गुरूंना साष्टांग नमस्कार करून मठ सोडून जाऊ लागला. तो कोंडोली गावात एक जंगलाजवळ आला. त्या जंगलात आंब्याच्या झाडाखाली येऊन गुरूचे नामस्मरण करू लागला. तेथे तो रात्रभर राहिला. त्या झाडाखाली खूप मुंगळे झाले. त्यामुळे तो झाडावर जाऊन बसला. त्या आंब्याच्या झाडावर मुंग्या व मुंगळे खूप होते. तो लहान थोर फांद्यांवर जावून आला. पण त्याला बसायला जागा मिळत नव्हती. ते त्याचे कृत्य पाहून गुराख्यांना कौतुक वाटले. ते म्हणाले, हा माकडासारखा या झाडावर का फिरत आहे? लहान फांदीवर फिरून आला पण खाली पडला नाही, याचे आश्चर्य वाटते.

दुसरा गुराखी म्हणाला की, यात काही आश्चर्य वाटण्याजोगे नाही. गजानन महाराजांच्या भक्तांमध्ये असे सामर्थ्य असते. यावरून हा समर्थांचा भक्त आहे. चला हा इथे आल्याची बातमी आपण गावकऱ्यांना सांगू. त्या पोरांच्या तोंडून ते वृत्त लोकांना कळले. कोंडोलीचे लोक कोण आले ते पाहण्याकरिता आंब्याच्या झाडाजवळ आले. त्या पोरांना लोक म्हणाले, हा ढोंगी असावा म्हणून वेडे चाळे करतो. गजानन महाराजांचा खरा भक्त भास्कर पाटील होता. त्याचा काही दिवसांपूर्वी अंत झाला. समर्थांचे भक्त बर्फी पेढा सोडून येथे कशाला येतील? एकदा याला विचारून पाहू मग खरे खोटे ठरवू, तर्क काढणे बरे नाही. एक माणूस पुढे आला. पीतांबराला विचारू लागला. तू कोण? कोठील? कशास आला? तुझा गुरू कोण आहे?

पीतांबर म्हणाला, 'मी शेगावचा राहणारा शिंपी पीतांबर आणि गजानन महाराजांचा भक्त आहे. त्यांनी मला पर्यटन करण्यासाठी सांगितले म्हणून मी येथे आलो. झाडाजवळ बसलो, पण मुंगळे होते म्हणून फांदीवर बसलो.' त्याचे असे बोलणे ऐकून लोक संतापले. मोठ्या संतांचे नाव सांगून मस्करी करू नको. त्या गावचे श्यामराव देशमुख पाहण्याकरिता त्या वठलेल्या झाडाजवळ सगळी मंडळी आली.



अखेर पीतांबराने हात जोडून सद्गुरूरायाचे स्तवन सुरू केले. हे स्वामी समर्थ गजानना, आता धावून ये. माझ्यामुळे तुझ्यावर दोष येऊ लागला आहे, आता या झाडाला कोवळी पालवी फुटू दे. तो धावा करत होता. सगळ्या लोकांना पीतांबर म्हणाला, आता सद्गुरूंचा नाम गजर करूया, 'जय जय गजानन, साधू शेगावीच्या अवलिया' लोकही अवघे गजर करू लागले. तो काय चमत्कार झाला? वाळलेल्या झाडाला पालवी फुटली. सर्व गावकरी कौतुकाने पाहू लागले. कोणी म्हणे हे स्वप्न आहे का? ते आपल्या हाताला चिमटा घेऊन पाहू लागले. कोणी म्हणे ही नजरबंदी असेल. तो त्यांचा भ्रम निपटला. पान तोडून पाहताच फांदीला पांढरा चिक आलेला दिसला. मग सगळ्यांची खात्री पटली. वाळलेल्या झाडाला पालवी फुटली. स्वामी गजानन महाराज खरंच महान संत आहे. आता पीतांबरावर शंका घेऊ नये. हा खराच त्यांचा शिष्य आहे. चला त्यांना आपण गावात घेऊन जाऊ. त्यांच्यामुळे गजानन महाराज कधीतरी येथे येतील. पीतांबरास मिरवीत गावात घेऊन गेले. समर्थ रामदास स्वामींनी जसा आपला कल्याण नावाचा भक्त जगाला उद्धार करण्यासाठी पाठविला तसेच गजानन महाराजांनी कोंडोलीचे भाग्य उजळण्यासाठी हे कृत्य केले. अजूनही ते आंब्याचे झाड कोंडोलीला आहे. त्याला खूप फळं लागतात. काही दिवसांनी पीतांबराच्या भजनाची सर्व लोकांना आवड निर्माण झाली. त्यांचा कोंडोलीत मठ बांधण्यात आला व त्यांचा अंतही कोंडोलीत झाला.

म्हणाले, 'अरे सोंगाड्या, स्वामी समर्थ गजानन प्रत्यक्ष ईश्वर आहे. त्यांचे नाव सांगून चेष्टा करतोस काय? अरे वेड्या, एका काळात त्यांनी आंब्याच्या झाडाला ऋतू नसताना फळे आणली. तू नुसती पाने आणून दाखव, नाहीतर या ठिकाणी तुझी वाट लागेल. हे वाळलेले झाड आहे. त्याला तू आमच्यासमोर पाने आणून दाखव. तू असं केलं नाही, तर मार खाशील आणि खरा असल्यास वंदनीय होशील. आता उशीर करू नको. हे आंब्याचं झाड हिरवगार करून दाखव.' पीतांबर घाबरून बोलला, माझी गोष्ट ऐका. एका खाणीत निघती हिरे आणि गारा. तैसाच मी गार आहे. गजानन महाराजांचा भक्त आहे. हे अजिबात खोटे नाही. मी माझ्या गुरूच्या नावास चोरून कशाला ठेवू? तेवढ्यात एक गृहस्थ बोलला, उगाच बडबड करू नकोस. शिष्यांवर संकट आल्यावर तो सद्गुरूंचा धावा करतो. तो शिष्य अधिकारी असला तर सद्गुरूंचा प्रभाव त्या शिष्यांस मदत करतो. पीतांबराला काही सुचत नव्हते. पीतांबर काय करतो, ते

# विभूतिद्वयांचे मनोमिलन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. माधव सदाशिव गोळवलकर उपाख्य श्रीगुरूजी संघकार्याच्या निमित्ताने १४ सप्टेंबर १९७२ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे आले होते. याच वेळी त्यांना रामदासी परंपरेतील महान संत, प्रल्हाद महाराज, साखरखेर्डा यांच्या दर्शनाची संधी लाभली. समर्थ परंपरेचे उपासक, राष्ट्रसेवेचे व्रतधारक श्रीगुरूजी आणि रामनामाचा प्रसार करणारे पूज्य महाराज या दोन महान तपस्वींची ही भेट चिखली येथील श्रीराम मंदिरात घडली. बाबूराव राजे यांच्या घरातून अनवाणी पायाने, अत्यंत भक्तिभावाने चालत येऊन श्रीगुरुजींनी प्रल्हाद महाराजांचे दर्शन घेतले होते. याचे अनेक साक्षीदार आजही त्या गावात मोठ्या अभिमानाने हा प्रसंग सांगतात.



या भेटीदरम्यान प्रल्हाद महाराजांनी श्रीगुरुजींच्या राष्ट्रकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत सांगितले की, सर्वसामान्य जनतेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हेच एक संरक्षक कवच आहे. संघ असल्यामुळेच रामकार्य निर्विघ्नपणे पुढे जाईल. या उद्गाराची प्रचिती आज आपण सगळेजण घेत आहोत.

प्रल्हाद महाराजांना प्रतिसाद देताना श्रीगुरुजींनी अत्यंत नम्रतेने अभिवादन करून समर्थ परंपरेतील सवाई म्हटली होती.

**नाम श्रीराम सुंदर। ध्याती उमा महेश्वर।**
**सिंहासनी रघुवीर। अंकी सीता शोभली।।**

श्रीगुरुजींच्या मुखातून निघालेल्या या सवाईने वातावरण आध्यात्मिकतेने भारावून गेले. महाराज तर अतिशय आनंदित झाले होते आणि उपस्थितांना

गौरी बेलन
९८८११०४११२

दोन्ही संतांची समर्थभक्ती व रामदासी परंपरेतील एकात्मता प्रत्यक्ष अनुभवता आली होती. यानंतर सुमारे दहा-बारा मिनिटे या दोन्ही महान विभूतींमध्ये एकांतात संवाद झाला. सर्व उपस्थितांसमोर श्रीगुरुजींनी स्पष्टपणे नमूद केले की, संघकार्य अधिक व्यापक आणि प्रभावी व्हावे यासाठी संतांच्या आशीर्वादाची राष्ट्राला नितांत गरज आहे.

या दिव्य भेटीतून राष्ट्रकार्य आणि अध्यात्म यांचा अद्वितीय संगम प्रकट झाला. दोन्ही महापुरुषांच्या तेजस्वी चेहऱ्यावरून प्रकटणारा आनंद हा या ऐतिहासिक क्षणाचा जिवंत साक्षीदार ठरला. बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथील श्री प्रल्हाद महाराजांनी दान केलेल्या घरासह त्यांचा जीवनपट उलगडवून दाखवणाऱ्या संग्रहालयात हा प्रसंग अतिशय सुंदररीत्या रेखाटलेला बघावयास मिळतो.

# विश्वबंधुत्व दिन

**अमेरिकेतील माझ्या बंधु आणि भगिनींनो...**

स्वामीजींच्या अगोदर याच पाच शब्दांचे संबोधित करीत अनेकांनी भाषणाला सुरुवात केली होती. पण त्यांचे ते संबोधन अतिशय कोरडे, कृत्रिम, भावरहीत, बाह्योपचार असलेले होते! जेव्हा विवेकानंद म्हणाले, माझ्या बंधुभगिनींनो, तेव्हा त्यांचे बाहू आपोआप पसरले होते. जणू प्रेमाने मिठीत घ्यायला ते तयार झाले होते. स्वामीजींच्या डोळ्यात बंधुत्वाचा भाव चमकत होता. आवाजात मृदु कंप, संवेदना, ओढ, आपुलकी, स्नेह, सहज जाणवत होता. जणु ती विश्वबंधुत्वाची हाक होती!

स्वामीजी बोलताना त्यांच्या पाठीशी हजारो वर्षाची हिंदु संस्कृती, परंपरा उभी होती. त्यांचे सद्गुरू, स्वामी रामकृष्ण परमहंस पाठीशी होते. स्वामीजी बोलताना त्यांचे आध्यात्मिक ज्ञान व अनुभव पाठीशी होता. जणु आकाशात ऋषी-मुनी, संत-महंत, अवतारी पुरुष पुष्पवृष्टी करण्यासाठी हातात फुले घेऊन उभे होते आणि म्हणून स्वामीजींच्या संबोधनाला पाच हजार अमेरिकनांनी टाळ्यांचा कडकडाट करत प्रतिसाद दिला होता. हिंदु संस्कृतीने विश्व सख्य हा भाव युगानुयुगे जागता ठेवला आहे. सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयः। ही विश्वबंधुत्वाची प्रार्थना आहे. ज्ञानेश्वर माउली म्हणतात, किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होवुनी तिन्ही लोकी। हे मागणे पण विश्वबंधुत्व दाखविणारेच होते!

११ सप्टेंबर १८९३ रोजी स्वामीजी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधीत्व करताना, हाच विश्वबंधुत्व भाव स्पष्ट करीत होते. स्वामीजींच्या देहबोलीत आणि बोलण्यात जी समरसता होती, ती त्यांच्या आणि हिंदू धर्म संस्कृतीच्या हृदयातील हाक होती. शिकागोमध्ये स्वामीजींना खरे म्हणजे खूप गोष्टींचा त्रास सहन करावा लागला होता. स्वामींजवळ ओळखपत्र नव्हते. मद्रासमधील बंधुंनी गोळा केलेला निधीचे पैसे संपल्यामुळे उपवास घडले होते. जवळची बॅग चोरीला गेल्यामुळे पांघरुण, कपडे वापरायला नव्हते. अशा परिस्थीतीत स्वामींना अनेक अमेरिकन व्यक्ती भेटल्या. स्वामी त्यांच्याशी कसे वागले, बोलले यातून त्यांची वृत्ती लक्षात येते. सेनबर्ग मॅडम, जे डब्ल्यू हेल, प्रा. राईट, श्री व सौ. लायन, डॉ. बॅरोज, डॉ. बॉनी यांच्याशी संवाद करताना आपण स्वामींचे चरित्र

अनिल रामदासी
९९७५२४७२८२

वाचले तर लक्षात येते की, स्वामी विश्वबंधूत्वावर बोलत नव्हते, ते त्या भावाने वागत होते.

श्रीमती हेल मॅडमशी बोलताना खरे तर स्वामीजी खूप दमलेले होते. भुकेने व्याकुळ झालेले होते. तर मागे लागलेल्या गुंडामुळे स्वामीजी त्रस्त झाले होते. त्यांच्या अंगात बोलण्याचे सुद्धा त्राण नव्हते. पण तरी श्रीमती हेल यांच्याशी खूप सभ्यतेने बोलले होते. त्यांच्या बोलण्यातून सहज विद्वत्ता प्रकट होत होती. नम्रता दिसून येत होती आणि मग हेल मॅडम यांनी स्वामी विवेकानंदांची व्यवस्था त्यांच्या घरात केली. सर्वधर्मपरिषदेत आलेल्या प्रतीनिधींची व्यवस्था अनेक धनाढ्य आसामींकडे केली होती. त्यात डॉ. लायन यांच्याकडे स्वामीजींची राहण्याची व्यवस्था होती. त्याबरोबर अजून चार गोरे प्रतिनिधीपण होते.



डॉ. लायन यांच्याशी स्वामीजींचे प्राथमिक ओळखीचे बोलणे झाल्याने त्याचा प्रभाव डॉ. लायन यांच्यावर खूप झाला होता. आपल्या पत्नीशी बोलताना ते म्हणाले होते, मी स्वामीजी एवढा सभ्य गृहस्थ पाहिला नाही. त्या गोऱ्या प्रतिनिधींना आपण हॉटेलवर ठेवू या. पण या काळ्या सभ्य गृहस्थाला आपल्या घरी ठेवू या. यावरून आपल्या लक्षात की, स्वामींचा बंधुभाव किती उच्च कोटीचा होता?

स्वामी विवेकानंद हे विश्वबंधुत्वाने वागत होते, म्हणूनच त्यांच्या बंधुभावाच्या संबोधनाचा सहज परिणाम अमेरिकेतील लोकांवर झालेला होता. सर्वधर्म परिषदेतील आपल्या भाषणात बोलताना स्वामी विवेकानंद म्हणाले होते, 'मी ज्या धर्माचा प्रतिनिधी म्हणून आलो आहे, त्या धर्माने कुणावर आक्रमण केले नाही.' स्वामी म्हणाले, या धर्मपरिषदेची सुरुवात होण्याआधी दहा वाजता चर्चवरील ही मोठी घंटा वाजली होती. ज्या लोकांना वाटते, माझाच धर्म मोठा आहे, त्यांच्यासाठी ही 'मृत्युघंटा' आहे! जे लोक आपला धर्म दुसऱ्यावर आक्रमण करून लादू इच्छितात, त्यांच्यासाठी ही 'मृत्युघंटा' आहे!

आज स्वामी विवेकानंदांचे हे शब्द आपण ऐकले तर हे लक्षात येते की, जगातील अनेक धर्म सध्या अक्रमणाच्या तयारीत आहेत. कदाचित आता या मृत्युघंटा जोरजोरात वाजत आहेत. स्वामी विवेकानंद एकटे या सर्वधर्म परिषदेला गेले होते. त्यांच्याजवळ पैसा, धन नव्हते, पण जाज्वल्य हिंदुधर्मनिष्ठा होती. जगातील सर्व मानवाप्रती बंधुभाव होता. स्वामी विवेकानंद निर्भय होते. विवेकानंद जेव्हा निर्भयपणे व्यासपीठावर पावले टाकत, तेव्हा त्यांना लोक योद्धा संन्यासी असे संबोधत. आपण सर्व याच हिंदू संस्कृतीचे पाईक आहोत. आपण सर्व या संन्यासी स्वामी विवेकानदांचे पाईक आहोत. आपण सर्वजण, विश्वबंधुत्व भाव जागवत, स्वामीजींना अभिवादन करूया!



# सिडकोत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळ्याची विटंबना; बाजारपेठ कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

सिडको येथे अण्णाभाऊ साठे सभागृह येथे शाहीर आण्णाभाऊ साठे पूर्ण करतील पुतळ्यास कोणत्यातरी समाजकंटकांनी चपलाचा हार घालून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची विटंबना करून समाज बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत या वाईट पोस्ट करणाऱ्या समाजकंटकाचा निषेध व्यक्त करून त्यांना कठोरातील कठोर शिक्षा करण्यात यावी या मागणीचे निवेदन देऊन सिडकोतील बाजारपेठ कडकडीतबंद ठेवण्यात आली.

सिडको येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची विटंबना करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकास लवकरात लवकर शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जयंती मंडळाचे अध्यक्ष अंकुश गायकवाड व त्यांचे सहकारी व समाज बांधवांनी ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आले व नंतर सिडकोतील रस्ता बंद करून येथील बाजारपेठ पण कडकडीत बंद ठेवण्यात आली. यावेळी या निषेध आंदोलनात या प्रभागाचे नगरसेवक संजय घोगरे, वैजनाथ देशमुख, यांच्यासह नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, सतीश बसवदेव, उदय देशमुख यांच्यासह सिडकोतील सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यासह समाज बांधवांनी सहभागी होऊन सदरील घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच यावेळी काँग्रेस पार्टीचे जन आक्रोश आंदोलन चालू असताना ऐनवेळेस थांबवून त्यांच्या वतीने ही सदरील घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.सदरील घटनेतील आरोपीस लवकरात लवकर अटक करून त्यास कठोर शिक्षा करण्याची मागणी केली. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी परिस्थिती हाताबाहेर न जाऊ देता नियंत्रित ठेवण्यात आली. यावेळी स्वान पथकाच्या वतीनेही शोध घेण्यात आला सध्या तरी आरोपीचे धागेदोरे हाती लागले नसले तरी लवकरात लवकर आपण त्याचा छडा लावू असे पोलिसांनी सांगितले.

# इस्लापूरच्या विहिरीत हिरवे पाणी; ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ११ सप्टेंबर -**

गावातील शेकडो कुटुंबांची तहान भागविणाऱ्या सार्वजनिक विहिरीची दुरवस्था समोर आली असून पाणी हिरवट झाले आहे. विहिरीच्या पृष्ठभागावर शेवाळाचा थर साचला असून मधोमध झाडे-झुडपे वाढल्याने विहिरीची स्वच्छता आणि देखभालीचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून विहिरीत ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.

गावातील नागरिक याच विहिरीचे पाणी वापरत असून पाणीपुरवठ्यासाठीही तिचा उपयोग केला जातो. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर थेट



सार्वजनिक आरोग्याचा विषय बनला आहे. विहिरीचे नियमित निर्जंतुकीकरण आणि पाण्याची तपासणी केली जाते की नाही, याबाबत ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

पाण्याची अशी अवस्था असताना संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष का झाले, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका संभवत असल्याने प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

ग्रामपंचायत व संबंधित विभागाने विहिरीतील झाडे-झुडपे आणि शेवाळ काढून संपूर्ण स्वच्छता करावी, निर्जंतुकीकरण करावे तसेच पाण्याची अधिकृत तपासणी करून अहवाल जाहीर करावा, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची अशी अवस्था असताना प्रशासनाला हे चित्र दिसत नाही का? नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरच कारवाई होणार का? असा सवाल आता इस्लापूरकरांकडून उपस्थित केला जात आहे.

## प्रतीक्षेनंतर पाच पालकांना मिळाले हक्काचे बालक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

आई-वडील होण्याची इच्छा मनाशी बाळगून दत्तक प्रक्रियेची प्रतीक्षा करणाऱ्या पालकांची अखेर प्रतीक्षा संपली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मान्यतेने नात्यांतर्गत व सावत्र दत्तक प्रक्रियेतील पाच प्रकरणांना एकाच दिवशी अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यामुळे संबंधित पालकांना कायदेशीर प्रक्रियेतून हक्काचे बालक, तर बालकांना हक्काचे व सुरक्षित कुटुंब मिळाले आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत या पाचही प्रकरणांची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पालकांची प्रथम सीएआरए संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आली. त्यानंतर जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत गृहचौकशी करून प्रकरणे बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आली.

# राष्ट्रीय जलदिनाचा मुद्दा राज्यसभेत मांडावा ; खा. संजय राऊत यांच्याकडे महेंद्र पिंपळगावकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ सप्टेंबर -**

महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असून २० मार्च राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा ही मागणी राज्यसभेत उचलून धरावी अशी मागणी या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी शिवसेनेचे फायर ब्रँण्ड नेते, राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांची भेट घेऊन केली. खा. राऊत यांनी देखील या मागणीचे कौतुक करुन नक्कीच यावर अभ्यास करु असे आश्वासन दिले.

महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असून २० मार्च हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा अशी मागणी राज्य व केंद्रस्तरावर मागील तीन वर्षापासून सातत्याने करण्यात येत आहे. महामहीम राष्ट्रपतींना



याबाबत निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच राजकारणातील दिग्गज नेते खा. शरद पवार, खा. असदुद्दीन ओवेसी, केंद्रीय मंत्री चिराग पासवान, सामाजिक न्यायमंत्री खा. रामदास आठवले, खा.प्रा. ज्योतीताई वाघमारे तसेच राज्यातील वेगवेगळ्या खात्याचे मंत्री तथा वरिष्ठ सनदी अधिकार्यांची भेटी घेऊन राष्ट्रीय जलदिनाची मागणी करण्यात आली. लोकप्रतिनिधींनी हा विषय देशाच्या सर्वोच्च सभागृहात मांडण्याचे आश्वासन दिलेले आहे. याबाबत लवकरच त्यांना स्मरणपत्रे देखील पाठविण्यात येणार आहेत. विविध सभा, संमेलने, धम्म परिषदा आदी वेगवेगळ्या स्तरावर राष्ट्रीय जलदिनाच्या मागणीचा ठराव घेण्यात येत आहे. समाजाच्या सर्वच स्तरातून या मागणीस मोठा पाठिंबा मिळत आहे.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते खा. संजय राऊत आज नांदेड दौर्यावर आले असता महेंद्र पिंपळगावकर यांनी आपल्या सहकार्यांसमवेत त्यांची भेट घेऊन आपले सविस्तर निवेदन सादर केले. खा. राऊत यांनी या निवेदनाचे सुक्ष्मपणे वाचन करुन हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असून याप्रकरणी नक्कीच अभ्यास करुन योग्य निर्णय घेऊ अशी प्रतिक्रिया दिली.

यावेळी भगवान गायकवाड, किशोर अटकोरे, पद्माकर सोनकांबळे, माधव जाधव, राजीव कदम आदी उपस्थित होते.

## बाऱ्हाळी परिसरात पोळा उत्साहात

**बाऱ्हाळी -** परिसरात पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा पोळा सण यंदाही मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. पावसाअभावी शेतकरी संकटात असतानाही वर्षभर शेतकऱ्यांसोबत



काबाडकष्ट करणाऱ्या बैलांना सजवून बैलांप्रती कृतज्ञा व्यक्त करण्यात आली. ग्रामीण भागात आजही पारंपारिक पद्धतीने पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्या अनुषंगाने पोळा सणाच्या अगोदरच्या दिवशी बैलांना नदीवर नेऊन स्वच्छ अंघोळ घालण्यात आली. संध्याकाळी बैलांची पूजा (औक्षण ) करून पुरणपोळी व गोडाचा नैवेद्य खाऊ घातला जातो. दुसऱ्या दिवस म्हणजे पोळा सणा रोजी परिसरात बैलांच्या पाठीवर आकर्षक झूल, शिंगाणा रंग व बाशिंग तसेच पायात व गळ्यात घुंगरू बांधून वेगवेगळ्या पद्धतीने बैलांना सजवून गावातील हनुमान मंदिर भोवती फेऱ्या घातले जातात. त्यानंतर त्यांची पूजा करून सार्वजनिक किंवा आपापल्या घरी बैलांचा लग्न सोहळा पार पाडला जातो. यानुसार बाऱ्हाळीसह दापका गुंडोपंत, सुगाव कॅम्प, कोळनूर, हसनाळ, आंबुलगा, माकणी, वसूर, भिंगोली, भेंडेगाव, हातराळ, बापशेटवाडी, थोटवाडी, जिरगा, मांजरी, उंद्री, पैसमाळ, निवळी, हिप्पळनारी, डोरनाळी, वडगाव, भाटापूर, रावणगाव, भासवाडी आदी गावांत पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, पोळा सण शांततेत पार पडावा यासाठी मुक्रमाबाद पोलिस ठाण्याचे सपोनि राजू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सोपोउपनि शंकर मोरे, प्रभाकर कदम, सुभाष सिद्धेश्वरे, योगेश महेंद्रकर, दत्तात्रय गंगावरे, बब्रुवान लुंगारे, गजानन ढगे, राजकुमार पाटील, माधव जळकोटे, माधव मलगिरवार आदी कर्मचाऱ्यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

## कुणबी प्रमाणपत्रासाठी महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरे

**नांदेड -** कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे, नोंदी व पुरावे सादर करता यावेत, तसेच प्रमाणपत्र वितरणाची कार्यवाही सुलभ व्हावी, यासाठी लोहा तालुक्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार आयोजित या शिबिरांमध्ये मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे कुणबी नोंदी शोधणे, पुराव्यांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे तसेच पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**टि.सी हरवली**

शेख शादुल्ला लालामियाँ या नावाची इय्यता दहावी पासची मुळ टि.सी व इतर कागदपत्रे उमरी ते नांदेड बस प्रवासात हरवले आहेत . कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावे .

**संपर्क**
**शेख शादुल्ला लालामियाँ**
**रा . बितनाळ ता . उमरी जी नांदेड ( ह.मु रहिमनगर परभणी )**
**मो नं .९९२३१५३०८५**

# हिमायतनगर परिसरात पावसाची दडी ; शेतकऱ्यांवर कोरड्या दुष्काळाचे सावट

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ११ सप्टेंबर-**

हिमायतनगर तालुक्यातील यंदाच्या खरीप हंगामात सरासरीच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाल्याने पिके धोक्यात आली आहेत. अधूनमधून झालेल्या रिमझिम पावसावर तग धरलेल्या पिकांना आता पावसाने दडी मारल्याने वाढत्या तापमानाचा मोठा फटका बसत आहे. हलक्या जमिनीतील अनेक शेतांमध्ये पिके अक्षरशः माना टाकू लागली आहेत.

कापूस, सोयाबीन, तूर, हळद, उडीद, मूग आदी पिके सध्या फुलोरा, फळधारणा तसेच शेंगा व बोंडे भरण्याच्या अवस्थेत आहेत. मात्र, याच काळात पावसाने पाठ फिरवल्याने आणि तापमानात वाढ झाल्याने पिके वाळून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ऐन तोंडाशी आलेला घास निसर्ग हिरावून नेतो की काय, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली असून शेतीवर केलेला खर्चही निघेल की नाही, याची चिंता आहे.

पिकांचे नुकसान झाल्यास कुटुंबाचा दैनंदिन खर्च, मुलांचे शिक्षण, विवाह तसेच अन्य गरजा कशा भागवायच्या, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यांचबरोबर शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पाळलेले दुभते जनावरे व पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धताही भविष्यात गंभीर समस्या ठरण्याची शक्यता आहे. अपुऱ्या पावसामुळे शेतशिवारात मुबलक वैरण उपलब्ध होणे कठीण झाले आहे.

# मुदखेड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ११ सप्टेंबर -**

मुदखेड तालुक्यात यावर्षी सरासरीपेक्षा अत्यल्प पाऊस झाल्याने शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, तालुक्यात कोरड्या दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुदखेड तालुक्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावा, अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात संघटनेच्या वतीने तहसीलदार, मुदखेड यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले तरी तालुक्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस झाला नाही. सरासरीपेक्षा मोठ्या प्रमाणात पाऊस कमी झाल्याने



खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

पिके सुकण्याच्या मार्गावर असून सर्वत्र दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाची प्रतीक्षा करणारा बळीराजा आता शासनाकडे मदतीच्या अपेक्षेने पाहत आहे. त्यामुळे प्रशासनाने तालुक्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून शासन स्तरावर पाठपुरावा करावा आणि मुदखेड तालुक्यात लवकरात लवकर कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी प्रहार भावी जिल्हाध्यक्ष अनिल शेटे पा.नांदेड,प्रहार महिला अध्यक्ष सौ.केशरताई शिंदे पा.,प्रहार शिवसेना ता.अध्यक्ष शंकरराव शिंदे पा.,प्रहार सचिव साहेबराव निवडंगे,प्रहार सामाजिक कार्यकर्ते श्याम मुत्तकलवाड व प्रहार मित्र मंडळ उपस्थित होते.

# नायगाव तालुक्यातील रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करा : शिवसेना

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ११ सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील विविध विकासकामांच्या घोषणा होऊन अनेक वर्षे उलटली, तरी काही कामे अद्याप रखडली आहेत. त्यामुळे शासनाने केलेल्या घोषणांचा आढावा घेऊन प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दि. ९ सप्टेंबर रोजी बुधवारी नायगाव तहसीलदारांना निवेदन दिले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर 'मराठवाड्याचा विकास, तुम से ना हो पायेगा!' या घोषवाक्याखाली १ ते १७ सप्टेंबरदरम्यान विविध सरकारांनी केलेल्या विकासकामांच्या घोषणांचा आढावा घेण्याचा उपक्रम सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



नांदेड जिल्ह्यासाठी विविध मंत्रिमंडळ बैठका तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत अनेक विकासकामांची घोषणा करण्यात आली. मात्र, यातील किती कामे पूर्ण झाली, किती प्रगतिपथावर आहेत आणि किती कामे अद्याप कागदावरच आहेत, याची माहिती प्रशासनाने जनतेसमोर मांडावी, अशी मागणी पक्षाने केली आहे.

नरसी-घुंगराळा येथील २२२ केव्ही वीज केंद्र तातडीने सुरू करावे, शेळगाव छत्री-कुंटूर मार्गावरील कोकलेगाव पुलाचे काम सुरू करावे, नायगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्यावे, तालुक्यातील स्मशानभूमीचा प्रलंबित प्रश्न सोडवावा आणि जलजीवन मिशनअंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करावी, अशा सहा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, तसेच ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली.

निवेदनावर विधानसभा प्रमुख राजेश लंगडापुरे, विधानसभा उपसंघटक बालाजी मालीपाटील, तालुका प्रमुख रविंद्र पाटील भिलवंडे, शहर प्रमुख गजानन तमलुरे, मारोती भागानगरे, भागवत पाटील शिंदे, बालाजी कुरे, साहेबराव हेंडगे, शंकर तमवाड, प्रभाकर मेघळ, शिवाजी पाटील शिंदे, रावसाहेब वडजे, नागेश कुऱ्हाडे, शिवशंकर भेलोंडे, माधव वानखेडे, प्रभाकर पाटील, अनिकेत शिंदे, देविदास मारोती बेलकर, पांडुरंग पाटील मोरे, इम्रान मदार बेग, शिवाजी इबितदार, संतोष देशमुख, बंडू कवठेकर, पप्पन गायकवाड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भोकर येथे कूणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिर

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ११ सप्टेंबर -**

शासनाच्या निर्देशानूसार येथील उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी व तहसीलदार विनोद गूंडमवार यांच्या आदेशाने तहसील कार्यालयात मराठा कूणबी जात प्रमाणपत्र काढण्याकरिता विविध अडचणीचे निराकरण करण्यासाठी व योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी दि.११ रोजी शूक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सूमारास विशेष शिबिर घेण्यात आले.

भोकर तालूक्यात एकूण ०८ मराठा कूणबी जातप्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली आहेत.तसेच मराठा समाजातील जनतेस आता पर्यंत ९६६ सामाजीक व शैक्षणिक मागासवर्ग प्रमाणपत्र(एस.ई.बी.सी.) निर्गमित करण्यात आलेली आहेत.यापूढे ही मराठा समाजाचे पात्र व्यक्तींना ज्यांचे कूटूंबात कूणबी जातीच्या नोंदी मिळाल्या आहेत,त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळणेसाठी येणार्या अडचणी संदर्भात शिबिरात मार्गदर्शन करण्यात येत आहे.१२ सप्टेंबर रोजी भोसी महसूल मंडळामध्ये तर १५ सप्टेंबर रोजी मोघाळी व किनी व दि.१६ सप्टेंबर रोजी मातूळ येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार प्रशांत कावरे,किरण कावळे,मंडळ अधिकारी गणेश अन्नरवाड, अभिषेक कवानकर,तलाठी अनिल मूनेश्वर, अभिलाष सूर्यवंशी, संजय असोले,संजय उबाळे,महसूल सेवक राहूल कदम,माने,मूनगे,ग्राम पंचायत अधिकारी एस.बी.काळे उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ हिमायतनगर कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ११ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या पंधरा दिवसांपासून आमरण उपोषण सुरू असून, त्यांच्या समर्थनार्थ शुक्रवारी हिमायतनगर शहर बंदचे आवाहन मराठा समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते. या आवाहनाला शहरातील व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत बाजारपेठ कडकडीत बंद ठेवली. यावेळी मराठा समाज बांधवांच्या वतीने शहरातून रॅली काढून विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार पल्लवी टेमकर यांना देण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देत सरकारने मराठा आरक्षणाच्या मागणीची तातडीने दखल घ्यावी, तसेच मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या त्वरित मान्य कराव्यात, अशी मागणी यावेळी समाज बांधवांनी केली.

शुक्रवारी हिमायतनगर शहरातील सर्व प्रमुख बाजारपेठा व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. व्यापाऱ्यांनी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने शहरातील मुख्य बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट पाहायला मिळाला. यानंतर मराठा समाज बांधवांनी शहरातून रॅली काढून आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली.

दरम्यान, श्री परमेश्वर मंदिर प्रांगणात मराठा समाज बांधवांच्या वतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत विविध मान्यवर व समाज



बांधवांनी मनोगत व्यक्त करत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

या सभास्थळी तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी भेट देऊन मराठा समाज बांधवांशी संवाद साधला. हिमायतनगर तालुक्यात कुणबी जात प्रमाणपत्राच्या वितरणासाठी महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मराठा समाज बांधवांनी केलेल्या मागण्या शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी सांगितले.

मराठा समाजाच्या बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, संपूर्ण बंद शांततेच्या वातावरणात पार पडला. हिमायतनगर शहरात दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आल्याने मराठा आरक्षणाच्या मागणीला नागरिक व व्यापाऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

# कृतिशील शिक्षक हे शाळेचे खरे वैभव : उमाकांत गोपछडे

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ११ सप्टेंबर -**

उपक्रमशील शाळेतील कृतिशील शिक्षक हेच विद्यार्थ्यांना जीवनाचा खरा मार्ग दाखवतात, म्हणूनच ते शाळेचे खरे वैभव असतात, असे प्रतिपादन बिलोली पंचायत समितीचे माजी उपसभापती उमाकांत गोपछडे यांनी केले. ते जय किसान माध्यमिक विद्यालय कोल्हेबोरगाव येथे शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ.



सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून केशवराव नावाडे, मुख्याध्यापक विजय होपळे,आनंदराव पाटील गोपछडे व अशोक पाटील लघुळकर, सौ अनिताताई गोपछडे, खंडू पांडागळे उपस्थित होते.

याप्रसंगी कोल्हापूर जिल्हा परिषदेत शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल कु. ऋतुजा पांडागळे आणि बुलढाणा जिल्हा परिषदेत निवड झाल्याबद्दल भाऊसाहेब गाडेकर यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना, मेहनत आणि सातत्य यामुळेच यश संपादन करता येते, असा सल्ला या नवनियुक्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिला.

मुख्याध्यापक विजय होपळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आजच्या संगणक व मोबाईलच्या युगात शिक्षकांचे महत्त्व अजिबात कमी होणार नाही त्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनासोबत संस्कार देणे अत्यंत गरजेचे आहे. या वेळी विद्यार्थ्यांनीही शिक्षकांविषयी आदर व्यक्त करत डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बळीराम हासगुळे यांनी केले, सूत्रसंचालन कु. सुप्रिया रामपूरे हिने केले, तर सुभाष आगसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक विजय होपळे, साहेबराव पांचाळ, बळीराम हासगुळे, गणेश सुवर्णकार, काशिनाथ लगडे, सुभाष आगसे, अशोक होरे, संतोष पाटील, अतुल गोपछडे, सौ. रूपाताई गोपछडे, गोविंद मदेवाड, हणमंत उत्तरवाड व निळकंठ मुठनवाड यांनी परिश्रम घेतले.